POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६७ ● मुंबई, रविवार, १८ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महापौरसाठी ५ उमेदवारांच्या नावाची चर्चा

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

महापालिका निवडणुकीच्या निकालांनी मुंबईचे राजकीय चित्र पूर्णपणे बदलून टाकले आहे. भारतीय जनता पक्षाने या महाकाय लढाईत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. देशातील सर्वात श्रीमंत महापालिकेवर नियंत्रण मिळवले आहे. या विजयासह, सर्वांच्या नजरा आता मुंबईचा पुढचा महापौर कोण असेल याकडे लागल्या आहेत. यासाठी काही नावे समोर आली आहेत. निवडणूक प्रचारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक शक्तिशाली आणि धोरणात्मक विधान केले होते की 'मुंबईचा पुढचा महापौर हिंदू आणि मराठी असेल.' निकाल भाजपच्या बाजूने आल्यामुळे, फडणवीस यांचे वचन राजकीय विधानापेक्षा जास्त झाले आहे. भाजपसाठी एक मोठे आव्हान व संधी बनले आहे. स्थानिक ओळख आणि प्रादेशिक अभिमानाला प्रोत्साहन देणे हा संकुचित राजकारणाचा विषय नाही तर संवैधानिक अधिकार आहे असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. २०२६ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्ष सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापौर हिंदू आणि मराठी असेल या विधानानंतर, पक्षात या निकषांवर पूर्ण करणाऱ्या उमेदवारांबद्दल चर्चा तीव्र झाली आहे. तेजस्वी घोसाळकर, प्रकाश दरेकर, प्रभाकर शिंदे, मकरंद नार्वेकर, राजश्री शिरवाडकर या पाच नावांची महापौर पदासाठी चर्चा सुरू झाली आहे.



### संख्याबळ पक्षनिहाय

- भाजप : ८८(मागील निवडणुकीतील संख्या : ८२)
- शिवसेना २८(मागील निवडणुकीतील संख्या : 00)
- उबाठा : ६५(मागील निवडणुकीतील संख्या : ८४)
- मनसे :०६ (मागील निवडणुकीतील संख्या : ०७)
- काँग्रेस : २४ (मागील निवडणुकीतील संख्या : ३१)
- एमआयएम : ०८ ((मागील निवडणुकीतील संख्या : ०२)
- राष्ट्रवादी काँग्रेस : ०३ ((मागील निवडणुकीतील संख्या : ०७)
- राष्ट्रवादी काँग्रेस शप : ०१ ((मागील निवडणुकीतील संख्या : ००)
- पक्ष : ०२

## मुंबई महापालिका निवडणूक निकालात काय घडले?

### नवे चेहरे

भाजप नवनाथ बन उबाठा निशिकांत शिंदे भाजप तेजिंदर सिंग तिवाना भाजप रोहिदास लोखंडे भाजप कशिष फुलवारिया उबाठा अंकित प्रभू उबाठा किरण तावडे उबाठा भारती पेडणेकर उबाठा राजुल पाटील मनसे सई शिर्के डॉ. सरीता म्हस्के भाजप कल्पेशा कोठारी उबाठा जोसेफ कोळी उबाठा भास्कर शेट्टी उबाठा विजय भगणे उबाठा पदमजा चेंबूरकर शिवसेना वनिता नरवणकर उबाठा आबोली खाड्ये भाजप सनी सानप उबाठा संपदा मयेकर भाजप डॉ. गौरवी नार्वेकर शिवलकर शिवसेना मंगेश पांगारे शिवसेना दिक्षा कारकर शिवसेना अदिती खुरसुंगे भाजप योगेश वर्मा मनसे सुरेखा परब भाजप सायली कुलकर्णी भाजप दिव्या सिंग उबाठा झिशान मुलतानी भाजप रुपेश सावरकर उबाठा सबा खान भाजप मिलिंद शिंदे भाजप अंजली सामंत काँग्रेस डॉ. अमन अरशद आझमी मनसे यशवंत किल्लेदार शिवसेना मिनल तुर्डे उबाठा लक्ष्मी भाटीया विजयाचा चौकार उबाठा रमाकांत रहाटे भाजप राखी जाधव

### सलग दुसऱ्यांदा नगरसेवक बनले

तेजस्वी घोसाळकर जितेंद्र पटेल बाळा तावडे प्रीती सातम तुलिफ मिरांडा उर्मिला पांचाळ सोनम जामसूतकर गीता भंडारी हर्षिला मोरे हेतल गाला योगिता कोळी जागृती पाटील अर्चना भालेराव समृद्धी काते अंजली नाईक आशा मराठे महादेव शिवगण किरण लांडगे विजेंद्र शिंदे टी. एम. जगदीश सचिन पडवळ आकाश पुरोहित हर्षिता नार्वेकर श्वेता कोरगावकर लिना देहेरकर धनश्री भरडकरकर तुळशीराम शिंदे सुहास वाडकर हर्ष पटेल श्रीकला पिल्ले संदीप पटेल रोहिणी कांबळे प्रज्ञा भूतकर हेतल गाला डॉ. निल सोमय्या साक्षी दळवी प्रवीण मोरजकर अमेय घोले

### सलग तिसऱ्यांदा निवडून आलेले, साधली विजयाची हॅटट्रिक

काँग्रेस अश्रफ आझमी भाजप प्रकाश गंगाधरे उबाठा हेमांगी वरळीकर भाजप राजेश्री शिरवडकर, काँग्रेस कमरजहाँ सिद्दीकी राष्ट्रादी काँग्रेस डॉ. सईदा खान भाजप अलका केरकर उबाठा चित्रा सांगळे भाजप डॉ. मकरंद नार्वेकर

### दुसऱ्यांदा निवडून आलेले नगरसेवक

पूजा महाडेश्वर रितू तावडे शिवानंद शेट्टी वर्षा टेंबवलकर जितेंद्र वळवी प्रमोद सावंत शिवानी परब सगूण नाईक आशा काळे

### तिसऱ्यांदा निवडून आलेले

अश्विनी मते विशाखा राऊत विठ्ठल लोकरे ज्ञानराज निकम

### चौथ्यांदा निवडून आलेले नगरसेवक

भाजप : प्रभाकर शिंदे शिवसेना : मिलिंद वैद्य उबाठा : यशोधर फणसे . उबाठा : किशोरी पेडणेकर भाजप : चंदन शर्मा

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

कुलाबा विधानसभेत भाजपच्यावतीने विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या कुटुंबात तीन जागा देत त्यांच्या कुटुंबातील तीन उमेदवार निवडणूक रिंगणात उतरल्याने एकच चचेर्चा विषय ठरला होता; परंतु या तिन्ही जागा ॲड. राहुल नार्वेकर यांनी निवडून आणल्या. नार्वेकर यांचे बंधू ॲड. मकरंद, बहीण गौरवी शिवलकर आणि वहिनी हर्षिता हे तिन्ही उमेदवार निवडून आले आहेत. कुलाबा विधानसभेतील प्रभाग क्रमांक २२५ मधून हर्षिता नार्वेकर या भाजपाच्यावतीने निवडणूक रिंगणात होत्या. याठिकाणी महायुतीतील शिवसेनेच्यावतीने सुजाता सानपही निवडणूक रिंगणात होत्या; परंतु त्यानंतरही हर्षिता नार्वेकर या विजयी ठरल्या आहेत. प्रभाग क्रमांक २२६मधून माजी नगरसेवक ॲड. मकरंद नार्वेकर हे निवडणूक रिंगणात होते. त्यांनी अपक्ष तेजल दीपक पवार याचा पराभव केला. तर प्रभाग क्रमांक २२७ मधून गौरवी नार्वेकर शिवलकर या निवडणूक रिंगणात होत्या. त्यांनी शिवसेनेच्या रेहान गफूर शेख यांचा पराभव केला.



### शिवडी ठाकरेंचीच, शिवसैनिकांनी शब्द पाळला

मुंबई महापालिका निवडणूक निकालात भाजपने चांगलीच मुसंडी मारली आहे. महापालिका स्थापनेनंतर प्रथम मुंबई महापालिकेवर भाजपचा महापौर विराजमान होणार आहे. शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सचिन पडवळ वॉर्ड क्र. २०६ मधून विजयी झाले आहेत. शिवडी हा ठाकरेंचा बालेकिल्ला असून येथे विजय मिळवण्यात त्यांना मोठं यश आले आहे. शिवडी ठाकरेंचीच राहणार असा शब्द येथील शिवसैनिकांनी ठाकरेंना दिला होता. सचिन पडवळ यांच्या विजयाने शिवसैनिकांनी शब्द पाळल्याचे दिसून येतेय. शिवडी, लालबाग, परळ हे ठाकरेंचेच राहणार हे सिद्ध केले आहे, असे पडवळ म्हणाले.

### कोणी गड गमावले ?

शिवसेना समाधान सरवणकर काँग्रेस रवी राजा शिवसेना दिप्ती वायकर काँग्रेस शितल म्हात्रे भाजप उज्वला मोडक शिवसेना अनिल कोकीळ भाजप विनोद मिश्रा अभासे गीता गवळी भाजप राजुल समीर देसाई भाजप योगीराज दाभाडकर शिवसेना राजु पेडणेकर उबाठा बाळा आंबेरकर शिवसेना प्रिती पाटणकर

### पराभूत

शिवसेना दिप्ती वायकर पोतनीस(खासदार रविंद्र वायकर यांची कन्या) राष्ट्रवादी काँग्रेस कप्तान मलिक(नबाव मलिक यांचे बंधू) शिवसेना रुपेश अशोक पाटील(आमदार अशोक पाटील यांचे पुत्रे) शिवसेना समृध्दी काते(आमदार तुकाराम काते यांची सून) शिवसेना जय कुडाळकर (आमदार मंगेश कुडाळकर यांचे पुत्र)

### कोणी गड राखले ?

राष्ट्रवादी काँग्रेस डॉ सईदा खान उबाठा किशोरी पेडणेकर उबाठा मिलिंद वैद्य उबाठा हेमांगी वरळीकर उबाठा श्रद्धा जाधव उबाठा सुहास वाडकर भाजप प्रकाश गंगाधरे भाजप प्रभाकर शिंदे काँग्रेस अश्रफ आझमी उबाठा हेमांगी वरळीकर भाजप हर्षिता नार्वेकर भाजप मकरंद नार्वेकर

### आमदार- खासदारांचे कोण जिंकले

उबाठा अंकित सुनील प्रभू(आमदार सुनील प्रभू यांचे पुत्र) उबाठा सोनम जामसूतकर (आमदार मनोज जामसुतकर यांची पत्नी) काँग्रेस कमरजहाँ सिद्दीकी (आमदार अस्लम शेख यांची बहीण) उबाठा निशिकांत शिंदे (विधान परिषद सदस्य सुनील शिंदे यांचे बंधू) उबाठा सबा खान (आमदार हारुन खान यांची कन्या) भाजप गौरवी नार्वेकर शिवलकर(आमदार ॲड. राहुल नार्वेकर यांची वहिणी) भाजप हर्षिता नार्वेकर, (आमदार ॲड. राहुल नार्वेकर यांची बहीण) भाजप ॲड. मकरंद नार्वेकर (आमदार ॲड. राहुल नार्वेकर यांचा भाऊ)

## २५ वर्षापासून असलेली ठाकरेंची सत्ता उलथवली आता मुंबईचा महापौर कधी होणार?

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा निकाल काल शुक्रवारी जाहीर झाला. भाजपने ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा पुन्हा एकदा मान मिळवला. तसेच मुंबई महानगरपालिकेवर गेल्या २५ वर्षांपासून असलेली शिवसेना आणि ठाकरेंच्या सत्तेला भाजप-शिंदे सेनेच्या युतीने सुरुंग लावला. यंदाच्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी मुंबईचा महापौर कधी आणि कोण होणार? याची जोरदार चर्चा रंगली होती. ठाकरे बंधूंनी मुंबईचा महापौर हा मराठी व्यक्तीच असेल, असं जाहीर केलं होतं. त्यामुळे सुरुवातीला मुंबईचा महापौर हिंदू होणार, असं बोलणाऱ्या भाजपला नंतर नंतर महापौर मराठी व्यक्तीच होईल, हे स्पष्ट करावं लागलं. आता बृहन्मुंबई महानगरपालिकेचा महापौर कधी आणि कोण होणार? याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. त्याचदरम्यान, मुंबईच्या महापौरबाबत एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

**मुंबईचा महापौर कधी-कोण होणार?**

मुंबईचा महापौर नेमका कधी आणि कोण होणार? यासाठी जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. खात्रीलायक सूत्रांच्या माहितीनुसार, या महिन्याच्या म्हणजेच जानेवारी अखेरीस महापौर निवड होण्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यात नगरविकास खाते महापौर पदासाठी सोडत काढणार आहे. महापौर सोडतीनंतर १० दिवसांनी मुंबईचा महापौर निवडला जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

**भाजपला शिंदेंचीच मदत**

मुंबई महानगरपालिकेतील महापौर पदावर भाजपचा दावा आहे. मात्र, शिंदे सेनेच्या काही नेत्यांनीही महापौरपदावर दावा केला आहे. मुंबई महानगरपालिकेत बहुमत तथा सत्तास्थापन करण्यासाठी ११४ जागांची गरज आहे. त्यामुळे भाजपला एकट्याला बहुमत सिद्ध करता येणार नाही. त्यामुळे त्यांना एकनाथ शिंदे गटाची मदत घ्यावीच लागणार आहे. त्यामुळे शिंदे गट महापौरपदासाठी अडून बसणार का? हे बघणं तितकच महत्त्वाचं असणार आहे.

**'निवडणुका येतील जातील पण आपला...'**

दरम्यान, गेल्या २५ वर्षांपासून ठाकरेंचा बालेकिल्ला असणाऱ्या मुंबई महानगरपालिकेचा गड भाजप-शिंदे गटाने काबीज केला. काल मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. यामध्ये भाजप ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष ठरला. तर ठाकरे गटाला ६५ जागांवर समाधान मानावे लागले. हा निकाल पाहता भाजपने मुंबईत ठाकरे गटाला चीतपट केल्याचे दिसतं. याचदरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी फेसबुकला पोस्ट करत निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांचं अभिनंदन केलं आहे.

## मुंबईत महायुतीचाच महापौर

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महापालिकेवर कुणाचा महापौर बसणार याबाबत सुरू असलेल्या चर्चांना आता मतपेटींतून आलेल्या निकालाने पूर्णविराम दिला आहे. मुंबईकरांनी ठाकरे ब्रॅण्डला नाकारत विकासाच्या मुद्द्यावर मत मागणाऱ्या भाजपच्या बाजूने कौल दिला आहे. मुंबईत भाजपचे तब्बल ८८ नगरसेवक निवडून आले असून शिवसेनेचे २८. या प्रकारे महायुतीचे एकूण ११६ नगरसेवक निवडून आले आहेत.

तर मागील २५ वर्षांपासून सत्ता भोगणाऱ्या उबाठाला मुंबईकरांनी सत्ते बाहेरचा रस्ता दाखवला आहे. त्यांचे केवळ ६५ नगरसेवक निवडून आले असून मनसेचे केवळ ६ नगरसेवक निवडून आले आहे. त्यामुळे ठाकरेंच्या बंधूंच्या युतीला केवळ ७१ जागा निवडून आल्या आहेत. त्यामुळे महापालिकेत बहुमत सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेल्या ११४ च्या मॅजिक आकडा पार करण्यात महायुतीला यश आले आहे. त्यामुळे महायुतीचा महापौर रोखण्यापासून भाजप आणि शिवसेनेला कोणीच रोखून शकत नसल्याचे निकालाने दाखवून दिले आहे. त्यामुळे मुंबई ठाकरेंची नसून भाजप आणि शिवसेना महायुतीचीच असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपचे १३७ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते, त्यापैकी ८८ उमेदवार हे नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. तर महायुतीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेनेने ९० जागा लढवल्या होत्या, त्यात त्यांचे २८ नगरसेवक निवडून आले आहेत.

तर महायुतीचा घटक असलेल्या परंतु स्वतंत्र निवडणूक लढवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे सरकारमधील महायुतीतील घटक पक्षांच्या नगरसेवकांची सख्या ११९ एवढी होणार आहे. त्यामुळे ११४च्या मॅजिकच्या आकड्याच्या पुढे निघून गेल्यामुळे महापालिकेवर महायुतीचा झेंडा फडकला जाऊन महायुतीचाच महापौर बनणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईत महापालिकेत १९९७ पासून सलग शिवसेनेची सत्ता असून मागील २५ वर्षे असणाऱ्या उबाठाला आता विरोधी बाकांवर बसण्याची वेळ आली आहे.

मागील निवडणुकीत भाजपचे ८२ तर उबाठाचे ८२ नगरसेवक निवडून आले होते. त्या तुलनेत यंदा भाजपने सहा जागा अधिक मिळवल्या आहेत, तर उबाठाला १९ जागा कमी मिळवता आलेल्या आहेत. त्यामुळे राज ठाकरेंना सोबत घेऊन दोन्ही भाऊ एकत्र येऊनही मुंबईत करिश्मा दाखवून शकले नाही. मुंबईत मराठीचा मुद्दा आणि ठाकरे ब्रँड चाललच नसल्याचे या निकालावरून स्पष्ट झाले आहे.

शिवसेनेचा पहिला महापौर १९७१ – ७२ मध्ये हेमचंद्र गुप्ते यांच्या रूपात झाले होते. त्यानंतरपासून १९९२ पर्यंत अधूनमधून शिवसेनेचे महापौर निवडून येते होते. त्यानंतर १९९२ ते १९९६मध्ये काँग्रेसचे महापौर बनले होते. या पाच वर्षांच्या शेवटच्या काळात काँग्रेसच्या नगरसेवकांनी बंडखोरी केल्यामुळे तत्कालिन शिवसेनेचे उमेदवार मिलिंद वैद्य हे महापौर म्हणून निवडून आले होते. त्यानंर १९९७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत तत्कालिन शिवसेनेचे नगरसेवक मोठ्या प्रमाणात निवडून आले आणि तेव्हापासून महापालिकेत उबाठाचा महापौर निवडून येत आहे. आता २०२६ मध्ये मुंबईच्या ७८ व्या महापौरांची निवड होणार आहे. मुंबईचा हा ७८वा महापौर आता भाजप महायुतीचा होणार आहे, त्यानुसार नगरसेवक गणसंख्येची गणितेही जुळून येत आहेत.

निवडणूक मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर प्रथमपासून भाजप पुढे राहिला होता आणि त्यानंतरही शेवटपर्यंत त्यांचे नगरसेवक अधिक निवडून येत पुढेच राहिले. त्यामुळे भाजपचे अंतिम निकालानंतर ८८ नगरसेवक निवडून आले, तर शिवसेनेचे २८ नगरसेवक निवडून आले. दुपारनंतर मॅजिक आकड्याच्या पुढे नगरसेवक निवडून आल्यांनतर भाजपच्या पक्ष कार्यालयाबाहेर जल्लोष सुरू झाला तर उबाठा शिवसेनेच्या शिवसेना भवनजवळ गुलाल उधळला गेला; परंतु तेथील गड जिंकल्यामुळे जल्लोष झाल्याचे पाहायला मिळाले होते.

या निवडणुकीत भाजप आणि शिवसेनेने विकासाचा मुद्दा पुढे नेत प्रचार केला होता, तर उबाठा आणि मनसेने केवळ मराठी अस्मितेला हात घालत मराठी आणि अमराठी मुद्दा हाती घेत प्रचार केला होता. त्यामुळे मुंबईकरांनी ठाकरे बंधूंच्या भावनिक मुद्द्याकडे लक्ष न घालता विकासाच्या मुद्यावर महायुतीला मतदान केल्याचे दिसून येत आहे.

## ऑनलाइन हवाई तिकीट बुकिंग फसवणुकीतून ९६,९०८ रुपये परत... सायबर पोलीस ठाण्याची यशस्वी कारवाई




### फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- ऑनलाईन ट्रेन, बस, विमानाचे टिकीट बुकींग करताना, शॉपिंग करताना वेबसाईटची खात्री केल्याशिवाय कोणताही आर्थिक व्यवहार करु नये.
- ऑनलाईन बुकींगकरीता, शॉपिंगकरीता, कस्टमर केअर क्रमांक गुगलवर सर्च करताना उपलब्ध होणारे मोबाईल क्रमांक व माहितीची पडताळणी केल्याशिवाय कोणतीही कारवाई करु नये.
- अनोळखी वेबसाईट, मोबाईल धारकांना आपले बैंक खाते, जन्मदिनांक, डळढ वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.
- अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.
- बैंक खात्यासंदर्भात, **Credit/Debit Card** खात्यासंदर्भात कोणतेही बदल करावयाचे असल्यास बैंकेत समक्ष भेट देवून बदल करावेत.
- कोणतेही ॲप डाऊनलोड करण्यापूर्वी त्याची पडताळणी करावी.
- ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

■मिरारोड। प्रतिनिधी,

Online Air Ticket Booking करताना फसवणुक झालेली रक्कम रुपये ९६,९०८/-तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश. अधिक माहितीनुसार मिरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणारे तक्रारदार श्री. साहू यांना मॉरीशस येथे जाणे असल्याने मुंबई-मॉरीशस असे विमान तिकीट बुक करण्याकरीता त्यांनी अनोळखी Online Air Ticket Booking च्या वेबसाईटवरुन तिकीट बुक केले. तक्रारदार यांनी ऑनलाईन तिकीट पाठविल्यानंतर त्यांना प्राप्त झालेल्या विमान तिकीटावर PNR क्रमांक नमुद नसल्याने तक्रारदार यांनी साईटवर दिलेल्या मोबाईल क्रमांकवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने तक्रारदार यांना त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आले. तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने सदरबाबत तात्काळ नोंद घेवून NCCRP Portal वर तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांचे झालेल्या व्यवहाराची माहिती घेतली असता, तक्रारदार यांची रक्कम ऑनलाईन E-Commerce द्वारे वापरण्यात आल्याचे दिसुन आले. तक्रारदार यांचे व्यवहाराची माहिती घेवुन तात्काळ संबंधितांसोबत पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांचे खात्यातुन झालेला व्यवहार रद्द होवुन रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्याबाबत कळविण्यात आले. तात्काळ केलेल्या पत्रव्यवहाराचे अनुषंगाने तक्रारदार यांचे खात्यातुन झालेला व्यवहार रद्द करण्यात आला.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी तात्काळ केलेल्या पत्रव्यवहाराचे अनुषंगाने तक्रारदार यांची फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम ९६,९०८/- रु त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्यात आलेनंतर रक्कम परत केल्याबाबत त्यांना प्रतिकात्मक चेक देवून माहिती देण्यात आलेली आहे.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३०/१९४५ या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार यावी.

सदरची कामगिरी श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक प्रकाश सावंत यांचेसह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, सपोनि/माणिकराव कतुरे, पोउनिरी/वैभव धनवडे, मपोहवा /माधुरी थिंडे, मपोअं/ स्नेहल पुणे, पोअं/ कुणाल सावळे, पोअं/ सावन शेवाळे, पोअं/राहुल बन, मसुब/प्रविण सावंत, राजेश भरकडे, सर्व नेम सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

- सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक – १९३०/१९४५
- सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट – www.cybercrime.gov.in



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## ये तो होना ही था...



**भाजपने निवडणुकीची समीकरणं बदलून टाकली आहेत, हे अजून विरोधकांना उमगलेलंच नाही. नेत्याभोवती फिरणारे किंवा पक्ष कार्यालयातील खुर्च्या उबवणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या जीवावर यापुढे निवडणुकांचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही.**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निकालाने जो आश्चर्यचकित होईल, त्याला राजकारणातला ओ की ठो कळत नाही, असं खुशाल समजा. तसं लेखी प्रशस्तीपत्र देण्यासही तो पात्र आहे, हे ठरवून टाका. गेली दहा वर्षे भारतीय जनता पक्ष ज्या पद्धतीने निवडणुका जिंकतो आहे, ते स्पष्ट दिसत असूनही कोणी या निवडणुकीत विरोधकांच्या विजयाची आशा लावून बसला असेल, तर त्याला खात्रीने भोळसटच म्हटलं पाहिजे. २०१४ मध्ये विरोधक बेसावध होते. त्यानंतर ते सावध होत गेले; पण त्यांचं सावध होत जाणं आणि त्याच वेळेला त्यांचा शक्तिपात होत जाणं या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडल्याने गेल्या दहा वर्षांत विरोधकांना कुठेच डोकं वर काढता आलं नाही. विधानसभेच्या निवडणुकीवेळी महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांची एकत्र मोट बांधली गेली. पण त्या एकत्रित विरोधी पक्षाचाच 'सुपडा साफ' झाल्याने त्यानंतर ही मोट शिल्लक राहणार नाही, हे गृहीतच होतं. नगरपालिका निवडणुकीपूर्वी मोट बांधण्याचे दिखाऊ प्रयत्न केले गेले. पण, तेही इतके क्षीण, इच्छाशक्तीचा अभाव असलेले होते की त्याने काही होणार नाही, हे दिसत होतं. महानगरपालिका निवडणुकांवेळी तर सगळेच वाघ झाले होते. प्रत्येक जण दुसऱ्यावर गुरकावत होता. त्यांचा एकत्र संसार शक्य नव्हता. अशा विखुरलेल्यांचं जे व्हायचं, तेच झालं. ते सगळे कागदी वाघ असल्याचं मतदारांनी एकच बटन दाबून सिद्ध केलं. विरोधकांमध्ये जे महत्त्वाचे दोन पक्ष होते, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही नेतृत्वहीन झाले आहेत. त्यांना ना रणनीती उरली आहे, ना उमेदवारांना बळ देण्याएवढी शक्ती. ठाकरे बंधू तर आपली मुंबईतली जहागिरी वाचवण्यातच जीवाचा आटापिटा करत राहिले. त्यामुळे, भारतीय जनता पक्षाला आता इथे विरोधकच शिल्लक नाही, असं चित्र महाराष्ट्रात निर्माण झालं. संपूर्ण महाराष्ट्रात भाजपला मतदारांनी जो कौल दिला, तो या अर्थाने अपेक्षितच होता. भारतीय जनता पक्षाच्या निवडणुकीच्या तयारीची, सूक्ष्म नियोजनाची, त्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यकर्त्यांच्या जाळ्याची कल्पना अन्य पक्षांना नाही. निवडणुका जाहीर होण्याआधी महिना - दोन महिना जागे होणारे हे पक्ष आणि भाजपमध्ये खूप अंतर आहे. भाजपने निवडणुकीची समीकरणं बदलून टाकली आहेत, हे अजून विरोधकांना उमगलेलंच नाही. नेत्याभोवती फिरणारे किंवा पक्ष कार्यालयातील खुर्च्या उबवणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या जीवावर यापुढे निवडणुकांचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही. पक्ष नेतृत्वाने दुसऱ्या फळीतील नेत्याला जिल्हा किंवा तालुका बहाल करायचा आणि मग त्या नेत्याने खाली त्याच पद्धतीने प्रभाग - गट - पंचायती बहाल करून टाकायच्या ही राजकारणाची 'काँग्रेसी' घडी केव्हाच कालबाह्य झाली आहे. 'ठाकरे' आणि 'पवार' या दोन ब्रँडसाठी कार्यकर्त्यांनी निष्ठेने आपली फळी धरून ठेवण्याचे दिवसही संपले आहेत. बिहारमध्ये जे लालूप्रसाद यादव यांच्या घराण्याचं झालं, तेच इथेही होईल, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. लालूंच्यामागे त्यांची मुलं आपापली राजकीय समज घेऊन आपापल्या पद्धतीने मैदानात दिसतात तरी आहेत. इथे दोन्हीकडे पुढच्या पिढीत अंधार आहे. कार्यकर्त्यांच्या पातळीवर जाऊन काम करण्याची, पक्ष बांधण्याची क्षमता कोणातच नाही. मतदार अशांना फार काळ डोक्यावर घेऊन नाचत नाही. नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकांनंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ही बाब अधिक स्पष्ट होईल.' मुंबईचा ठाकरेंचा आणि पुण्याचा पवारांचा' असे माध्यमांनीच उभे केलेले 'गड' किती खोटे आणि पोकळ होते, हे यानिमित्ताने सिद्ध झालं, ते एक बरं झालं. महायुतीतल्या पवारांचा आकार त्यामुळे देशाला कळला. विमनस्क अवस्थेत त्यांनी भाजपवर आणि भाजपच्या नेत्यावर जे वार केले, ते त्यांच्याच अंगलट आले. बारामती मतदारसंघातल्या फुगवलेल्या प्रभावापलीकडे पुण्यात प्रत्यक्ष जमिनीवर यांना काही जागा नाही, हे भाजपच्या पुण्यातल्या नेत्यांनी दाखवून दिलं. 'खिशात नाही आणा अन् मला बाजीराव म्हणा' हे कोणाला लागू होतं, तेच मतदानाच्या आकड्यांनी स्पष्ट केलं. पुण्याच्या पालक मंत्रीपदाचा त्यांचा हट्ट पुढच्या वेळी किती मानला जाईल, कोणास ठाऊक! महाराष्ट्राने आता 'ट्रिपल इंजिन' स्वीकारलं आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थानिक निवडणुकांत येण्याची गरजच नाही. आमचा तुमच्यावर विश्वास आहे', हेही मतदारांनी या निवडणुकीत सांगून टाकलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधुनिक महानगरांबद्दल अनेक कल्पना आहेत. त्या प्रत्यक्षात आणणं आता सोपं जाईल. बकाल झालेल्या, अस्ताव्यस्त पसरलेल्या शहरांना आकार देता येईल. त्या त्या भागातल्या संस्कृतीला अनुसरून शहरांना चेहरा देता येईल. सर्व शहरं स्वच्छ, नेटकी करण्याला प्राधान्य देण्याची नितांत गरज आहे. अन्य राजकीय पक्षांना सोबत घेऊन ती शक्य तितकी 'फ्लेक्स'मुक्तही करायला हवीत. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अहिल्यानगर या शहरांकडे नियोजनाच्या दृष्टीने आत्ताच लक्ष दिलं नाही, तर उद्या तिथली परिस्थिती भयावह होईल. या सर्वच शहरांकडे स्वतंत्रपणे लक्ष देण्याची गरज असून मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील महानगरपालिकांचा एकत्रित विचार होण्याची गरज आहे. मतदारांनी भरभरून प्रेम व्यक्त केलं आहे. त्याची उतराई करण्याचं आव्हान महायुतीला स्वीकारावं लागेल. संपूर्ण महाराष्ट्र एकहाती हाती येण्याचं महत्त्व भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांना उत्तम ठाऊक आहे!

# स्त्रियांवरील अत्याचारांच्या विरोधातील सापेक्षता

दिल्लीत २०१२ साली घडलेले निर्भया अत्याचार प्रकरण कोणीही संवेदनशील व्यक्ति विसरू शकणार नाही. निर्भयावर झालेल्या अत्याचाराचे वर्णन वाचून लोक प्रचंड अस्वस्थ झाले आणि देशभरात रस्त्यावर उतरले. विशेषत: दिल्लीत तर अभूतपूर्व अशी निदर्शने झाली. सर्व जाती-धर्मातील लोक यात सामील झाले. या अत्याचाराची आणि त्याविरुद्ध झालेल्या आंदोलनाची तीव्रता एवढी होती की २०१३ साली फौजदारी कायद्यात सुधारणा होऊन कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आणि बलात्कार, अन्य लैंगिक अत्याचारांच्या व्याख्येची व्याप्ती वाढवली गेली.

निर्भया प्रकरणापूर्वी २००६ साली भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी येथे भोतमांगे कुटुंबातील चौघा कुटुंबियांची अनेक ग्रामस्थांकडून अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्यात एक महिला आणि तिची मुलगी यांचा समावेश होता. या दोघींची नग्नावस्थेत गावातून धिंड काढून, त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करून, हाल हाल केले होते. त्या वेळी सुरूवातीला हा अत्याचार दडपण्याचा प्रयत्न झाला. मात्र तो उघडकीस आल्यावर त्या विरोधात फक्त अत्याचारपीडित कुटुंबियांच्या जातीच्या लोकांकडूनच महाराष्ट्रातील काही भागात आंदोलने झाली. आंदोलन करणाऱ्यांच्या नशिबी पोलीस केसेसचा ससेमिरा मागे लागला आणि काहींचे करियर त्यात बरबाद झाले. हे बळी पडलेले कुटुंब अनुसूचीत जातीचे होते. अनुसूचीत जाती-जमतीच्या महिलांवरील अत्याचारच्या बाबतीत असलेली अन्य लोकांची उदासिनता ही देशाला तशी नवी नाही.

दिल्लीचे निर्भया प्रकरण, तेलंगणातील महिला पशूवैद्य प्रकरण, महाराष्ट्रातील कोपर्डी प्रकरण आणि अन्य प्रकरणांत समाजमन जेवढे ढवळून निघाले, जेवढा आक्रोश निर्माण झाला तेवढा खैरलांजी, हाथरस आणि अन्य प्रकरणांत निर्माण झाला नाही. यातून महिलांवरील अत्याचारांच्या बाबतीत एक परंपरागत सापेक्षता दिसून येत आहे ती आहे जात-सापेक्षता. ती खरी तर आधीपासूनच अस्तीत्वात होती आणि अजूनही आहे. म्हणजे, अत्याचार पीडित महिला किंवा अत्याचारी पुरुष कोणत्या जातीचे आहेत यावर त्या अत्याचाराचा निषेध करावा की नाही हे भारतीय समाजमन ठरवते.

आपल्या देशातल्या राजकारणाचा ताबा धार्मिकतेने, खरे तर धार्मिक उन्मादाने, घेतल्यानंतरच्या काळात महिलांवरील अत्याचाराला अजून एक सापेक्षता लाभली आहे ती आहे धर्म-सापेक्षता. म्हणजे पीडित महिला कोणत्या धमार्ची आहे, अत्याचार करणारा पुरुष कोणत्या धमार्चा आहे, यावरून त्या घटनेचा निषेध करायचा की नाही, आंदोलन करायचे की नाही हे ठरू लागले. गुजरात दंगलीत महिलांवर झालेले अत्याचार माणुसकीला काळिमा फासणारे होते. पण त्या पीडित महिला 'आपल्या' धर्माच्या नसून 'त्यांच्या' असल्याने आणि अत्याचार करणारे 'आपले' असल्याने तो अत्याचार क्षम्यच नव्हे तर न्याय्य ठरतो अशी मनोभूमिका जाणीवपूर्वक जोपासली गेली. तीस धार्मिक तसेच राजकीय नेत्यांच्या प्रक्षोभक वक्तव्याने पाठबळच लाभले आणि धर्म-सापेक्षता अस्तीत्वात आली. ज्या वेळी महिलांवरील नृशंश अत्याचारबद्दल शिक्षा झालेले आरोपी जी काही शिक्षा 'लाभली' ती भोगून कैदेतून बाहेर आले तेव्हा त्यांचे हारतुरे देऊन 'वीरोचित' स्वागत झाल्यावर धर्म-सापेक्षतेवर शिक्कामोर्तब झाले.



'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' असे एक संस्कृत वचन एकदा उच्चारले की, भारतीय महिलांविषयी रम्य, सुशील, पवित्र, दिव्य असे, जगात कुठेही अकल्पनीय असलेले चित्र उभे केल्याचा आणि आपली संस्कृती किती महान आहे याचा परमोच्च आनंद आपले भारतीय लोक घेत असतात. असे असले तरी महिलांवरील अत्याचारात, विशेषत: लैंगिक अत्याचारत दिवसेंदिवस वाढच होत चालली आहे. मुळात असे अत्याचार करणे ही विकृतीच. परंतु गेल्या काही काळात या विकृतीने एवढे भयानक आणि बीभत्स स्वरूप घेतले आहे की, आपण स्वत:ला माणूस म्हणवून घेण्याची शरम वाटावी.

महिलांवरील अत्याचार जात आणि धर्म सापेक्ष झाल्यावर निदान प्रकरण इथेच थांबेल तर बरे असे वाटत असतानाच; आता त्याची पुढची पायरी गाठली गेली आहे ती महिला कुस्ती खेळाडुंच्या लैंगिक शोषण प्रकरणानंतर. शोषण करणारा पुरुष 'आपल्या' पक्षाचा असल्याने त्या शोषणा विरोधातला आवाज म्हणजे आपल्या पक्षाच्या विरोधातला आवाज असे आता मानले जाऊ लागले आहे. अशी स्थिति निर्माण झाल्यास 'आपल्या' पक्षाच्या पुरुषाचा हिरीरीने बचाव आणि पक्ष विरोधावर प्रखर हल्ला करणे हे ओघाने आलेच याची प्रचिती या प्रकरणात आणि नंतर घडलेल्या तत्सम प्रकरणांतून आली. अशा अत्याचार प्रकरणात गुंतलेल्या पुरूषांना सन्मानाची पदे देण्याचे काम एका विचारधारेचा पक्ष करीत आहे. यातूनच जन्मलीय पक्ष-सापेक्षता.

महिलांवरील अत्याचारांमध्ये अशा प्रकारे जात-धर्म-पक्ष सापेक्षता आणली गेल्याने महिलांचे अधिकार, त्यांचा सन्मान, त्यांची अस्मिता, त्यांचे स्वातंत्र्य हे जिव्हाळ्याचे प्रश्न अडगळीत टाकण्यात इथली पुरुषप्रधान संस्कृती यशस्वी होत आहे. याचा छुपा आनंद या संस्कृतीचे पाठीराखे उपभोगत असताना त्यांच्या मागे महिलांचे फरफटत जाणे अत्यंत यातना देत आहे. पीडित महिलांची बदनामी करून अत्याचारी पुरुष केवळ आपल्या जात-पक्ष-धर्माचा असल्याने, त्याची पाठराखण करणाऱ्या स्त्रियांना पाहून यांना अजूनही आपल्या गुलामगिरीची जाणीव कशी झाली नाही याचे आश्चर्य वाटते. सवित्रिबाई फुले यांनी यासाठी शेणा-दगडांचा मारा सहन करून स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग दाखवला का, असा प्रश्न पडतो. एका गाजलेल्या बलात्कार प्रकरणात उच्च न्यायालयाने अत्याचारी पुरुषास जामीन दिल्यावर (आणि सर्वोच्च न्यायालयाने तो रद्द केल्यावर) काही महिला पुढे येऊन त्या अत्याचारी पुरुषाचे समर्थन सार्वजनिकरित्या करताना माध्यमांवर दिसत होत्या. स्त्री-पुरुष समतेसाठी जो संघर्ष सुरू आहे त्यात असे प्रकार अडथळे ठरत आहेत.

या सापेक्षतेचा परिणाम असा झाला आहे की, महिला अत्याचारच्या केंद्रस्थानी पीडित महिलेचा सन्मान, अधिकार, अस्मिता, राहण्याऐवजी अमक्या (जातीच्या-धर्माच्या-पक्षाच्या) प्रकरणाच्या वेळी तुम्ही कुठे निषेध नोंदवला होता, तेव्हा तुम्ही कुठे लपून बसला होता, तेव्हा होत नव्हते का महिलांवर अत्याचार, अशा प्रश्नांची व्हॉटअबाऊटरी सुरू होते. त्या पीडित महिलेला, मग ती कोणत्याही जाती-धर्म-पक्षाची असो, न्याय मिळाला पाहिजे असा काही कोणाचा उद्देश दिसत नाही.

आपल्या जवळच्या नात्यातील अत्याचारी पुरुषाचा बचाव त्याच्या कुटुंबियांनी करणे हे योग्य वाटत नसले तरी त्याकडे कौटुंबिक गरज म्हणून बरेचदा पहिले जाते. परंतु जेव्हा आपल्या जात-धर्म-पक्षाचा आयाम अशा अत्याचार प्रकरणांमध्ये आणला जातो तेव्हा ह्यमदर इंडियाह्ण चित्रपटातील राधा या पात्राची प्रकषार्ने आठवण येते. आपल्या कुटुंबाचे आर्थिक शोषण करणाऱ्या सुखीलालवर सूड उगवण्यासाठी त्याच्या नववधू कन्येला जेव्हा बिरजू हा राधाचा गुंड मुलगा पळवून नेत असतो तेव्हा त्या कन्येच्या रक्षणासाठी आणि सन्मानासाठी बिरजूला ती अडवते आणि जेव्हा तो आईचेही ऐकत नाही तेव्हा आपल्या पोटच्या पोराला ही माता गोळी घालते. अत्याचारतील जात-धर्म-पक्ष सापेक्षतेवर रामबाण उपाय म्हणून अशा राधा घडणे आवश्यक आहेत.

# 'शाई'स्तेखान!

**शाईवरून उभं केलेलं कुभांड हा विरोधी पक्षांचा स्टंट असल्याचं संध्याकाळपर्यंत उघड झालंच. अगदी एखाद्याच्या बोटावरून शाई पुसली गेली, तरी त्याने मतदान केंद्राच्या रजिस्टरमध्ये केलेली सही आणि त्याच्या मतदानाची नोंद कशी पुसता येईल?**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांतील २ हजार ८६९ नगरसेवकांना निवडण्यासाठी काल ३ कोटी ४८ लाख ७८ हजार १७ मतदारांना संधी होती. या संधीचा लाभ किती जणांनी घेतला, ते अंदाजे आज कळेल. आज हा अग्रलेख वाचत असाल, तेव्हां विविध उमेदवार आपापल्या दैवतांच्या मंदिरात जाऊन साकडं घालून बसले असतील. खासगी दूरचित्र वाहिन्यांनी काल मतदान संपल्या संपल्या आपल्या मतदानोत्तर चाचण्यांचे निकाल सांगायला सुरुवात केली. ज्या संस्थांनी हे अंदाज वर्तवले आहेत, ते त्यांचे अंदाज असतील आणि ते त्यांनी प्रचार काळात घेतलेल्या कानोशावरून, एकूण वातावरणावरून बांधले असतील, तर ठीक. पण, ज्याला 'एक्झिट पोल' म्हणजे 'मतदानोत्तर चाचणी' म्हटलं जातं, त्याचे निष्कर्ष इतक्या झटपट जाहीर करणं केवळ अशक्य आहे. मतदानाची विहीत वेळ संपल्यानंतरही काल अनेक केंद्रांवर मतदान सुरू होतं. काही ठिकाणी तर या विहित वेळेनंतर दोन तास उलटून गेले, तरी मतदान संपलं नव्हतं! निवडणूक आयोगाच्या हाताशी भली मोठी यंत्रणा असूनही नक्की किती मतदान झालं हे अचूकपणे सांगायला त्यांना दुसरा-तिसरा दिवस उजाडतो. तिथे चिमुकली यंत्रणा हाताशी असणाऱ्या अशा संस्था मतदानाची वेळ संपता क्षणी दुसऱ्या मिनिटाला वाहिन्यांद्वारे आपले 'एक्झिट पोल'चे आकडे सांगू लागतात, ही मोठी किमयाच म्हणावी लागेल!! माध्यम क्षेत्राची अगदी तोंडओळख असलेला माणूसही असे अहवाल वाहिन्यांपर्यंत जाणं, त्यांनी त्याची प्रसारणयोग्य तयारी करणं यासाठी किमान किती वेळ लागेल ते सांगू शकेल. त्यामुळे, या 'एक्झिट पोल'ना फार फार तर निवडणूक अंदाज म्हणावं. राजकारणात रस असलेल्या प्रत्येकानेच असे अंदाज बांधलेले असतात. संस्थात्मक स्वरूपात येऊन कोणी असे अंदाज सादर करत असतील, तर त्यांनी त्यांची कार्यपद्धतीही सांगायला हवी. वाहिन्यांनी ती विचारण्याचे कष्टही घ्यायला हवेत. या सगळ्याला टाळूनही काहींचे अंदाज वास्तविक निकालाच्या आसपास आलेच, तर ते त्यांचं नशीब समजावं. मतदान २९ महापालिकांसाठी असलं, तरी सर्वांचं लक्ष लागलं असणार, ते मुंबई महानगरपालिकेच्या निकालाकडे. मायानगरी मुंबईशी देशातील प्रत्येकाचं काही ना काही कारणाने भावनिक नातं आहे, हे त्याचं कारण आहेच. पण, त्याशिवायही महत्त्वाचं कारण, मुंबईत सारा देश वसला आहे, हे आहे. मुंबईचा कौल त्यामुळे त्या काळातला संपूर्ण देशाचा कौल मानण्याची पद्धत आहे. आशिया खंडातली सर्वात श्रीमंत महापालिका आहे ही. ७४ हजार कोटींपेक्षा मोठा अर्थसंकल्प असणाऱ्या या महापालिकेच्या आजही बँकेत ८० हजार कोटींपेक्षा अधिक ठेवी आहेत. उर्वरित २८ महापालिकांच्या एकूण जमाखर्चाची बेरीज केली, तरी ती मुंबईपेक्षा कमीच आहे. मुंबईनंतर मोठं शहर मानल्या जाणाऱ्या पुण्याचा वार्षिक जमाखर्च १० हजार कोटीही नाही. ज्या २९ महानगरपालिकांसाठी काल मतदान झालं, त्यातली सगळ्यात छोटी महानगरपालिका इचलकरंजीची आहे. तिचा वार्षिक जमाखर्च केवळ ६०० कोटी रुपयांचा आहे. मोठा गाजावाजा करून एकत्र आलेल्या ठाकरे बंधूंनी आपलं सगळं लक्ष मुंबईवरच केंद्रीत केलं. अगदी नावाला मुंबईबाहेर चार-दोन ठिकाणी पायधूळ झाडली, त्यामागचं कारण आता लक्षात आलं असेल. मुंबई महापालिका पुन्हा हातात आली, तर आपल्या दोन्ही पक्षांना नवसंजीवनी देता येईल. अन्यथा, आपलं राजकारण यापुढे अधिक वेगाने घसरणीला लागेल, याची कल्पना त्यांना आहे. म्हणूनच केवळ बंधू नाहीत, तर अख्खं ठाकरे कुटुंब जीवाच्या आकांताने मैदानात उतरलं होतं. आपल्या ऐक्याची ग्वाही देत होतं. पक्ष हा आपला कौटुंबिक व्यवसाय असल्याचं प्रत्यंतरच त्यांनी या निवडणुकीत शिवसैनिकांना दिलं. खात्री आहे, मतदाराने फटका दिला, तर दोन्ही पक्ष आता आहेत त्याच्या निम्मेही पुढच्या निवडणुकांत राहणार नाहीत. मुंबईकरांनी यापूर्वी २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान केलं, तेव्हा शिवसेना एक होती. राजकीय परिस्थिती अगदी वेगळी होती. तरीही शिवसेनेला भारतीय जनता पक्षापेक्षा फक्त दोनच जागा जास्तीच्या जिंकता आल्या होत्या. त्या शिवसेनेची आता असंख्य शकलं झाली आहेत. ठाकरे कुटुंबाला आपल्याशिवाय अन्य कोणी नेता मान्य नसल्याने दाखवण्यासाठीही त्यांच्याकडे वेगळा चेहरा नाही. तीस वर्षांच्या वाईट, भ्रष्ट कारभाराचं ओझं खांद्यावर आहे. अशा परिस्थितीत काल जे अंदाज वर्तवले गेले, ते ढोबळमानाने खरेच ठरण्याची शक्यता आहे. सगळ्यांचे तेच अंदाज आहेत.

# गोव्याच्या पर्यटनात मंदी, महाराष्ट्राला सुवर्णसंधी!

नाताळसह वर्षअखेरीचा काळ हा गोव्यातील पर्यटनाचा भरभराटीचा काळ मानला जातो. दरवर्षी येथे मोठ्या संख्येने देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होतात. गेल्या कैक वर्षांपासून वर्षाखेर आणि गोवा हे पर्यटकांचे एक समीकरण बनून गेले असून केवळ पर्यटनाच्या जोरावर गोव्याने जगात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्वच्छ, सुंदर आणि आकर्षक समुद्र किनारे भारतात केवळ गोव्यातच आहेत, असे नाही. भारतातील पूर्वेकडील तसेच पश्चिमेकडील अनेक राज्यांना समुद्र किनारे लाभले आहेत. परंतु, समुद्र किनाऱ्यांची योग्य प्रकारे निगा राखणे, तेथे कायम स्वच्छता ठेवणे, विविध प्रकारच्या सोयी-सुविधा निर्माण करणे, पर्यटनयोग्य त्यांचा वापर करणे आदी सर्वांकडे गोव्याने ज्या प्रकारे लक्ष दिले ते इतरांना शक्य झाले नाही.

परिणामी, भारतातील सर्वात छोटे राज्य असतानाही गोव्याने पर्यटनात जी भरारी घेतली ती भारतातील इतर कोणत्याही राज्यांना घेता आलेली नाही. गेल्या अनेक वर्षांपासून पर्यटनामध्ये गोवाच आघाडीवर असल्याची आकडेवारी आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये गोव्याच्या पर्यटनामध्ये घट झाल्यानंतर काही इतर राज्यांमध्ये पर्यटन वाढीस लागले असले तरी ते पर्यटनाच्या बाबतीत गोव्याप्रमाणे जगाच्या नकाशावर आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्यापासून अद्याप खूप दूर आहेत. देशांतर्गत पर्यटक तेथे जाण्यास आकर्षित होत असले तरी परदेशी पर्यटकांचा मात्र तितकासा ओढा तेथे नाही. जगभरातील परदेशी पर्यटकांचा भारतात पर्यटनासाठी ओढा हा गोव्याकडेच असल्याची आकडेवारी आहे.

केवळ परदेशी पर्यटकांच्या जोरावर पर्यटन क्षेत्रात गोव्याने काही आघाडी घेतलेली नाही. गोव्याच्या पर्यटनाचा इतिहास हा खूप पूर्वीपासूनचा आहे. अगदी पोतुर्गीज काळापासून गोव्यात पर्यटनाला एक अनन्यसाधारण महत्त्व होते. पोतुर्गीजांनी १५१० मध्ये गोवा जिंकल्यानंतर त्यांनी आपली संस्कृती येथे रुजवली. पोतुर्गीजकालीन चर्च, काही वाडे तसेच वारसा घरे जी आजदेखील गोव्यातील काही प्रमुख आकर्षणे आहेत. पोतुर्गीजांनी येथे राज्य करतानाही समुद्र किनाऱ्यांचे सौंदर्य जपण्यावर भर दिले होते. येथील किनाऱ्यांचे कधी बंदरांमध्ये रुपांतर करत ते उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला नाही. इतर समुद्र किनाऱ्यांच्या तुलनेत गोव्यातील समुद्र किनाऱ्यांवर मनाला एक वेगळ्या प्रकारची शांतता जाणवत असल्याचे लक्षात घेत त्यांनी येथील समुद्र किनारे जपण्याचे भान राखले. येथील स्वच्छ समुद्र किनारे, शांत जीवनशैलीमुळे आकर्षित झाल्याचे पोतुर्गीजांनीही नमूद करून ठेवले आहे.

आजही गोव्यातील पोतुर्गीजकालीन काही पर्यटन स्थळे देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करतात. गोवा मुक्ति संग्रामानंतर १९६०-७० च्या दशकात गोव्यात सुरू झालेली हिप्पी चळवळ येथील पर्यटन व्यवसायाला कलाटणी देणारी ठरली. १९६०-७० च्या दशकात युरोप आणि अमेरिकेतील तरुण पिढीने गोव्याला हिप्पी चळवळीचे केंद्र बनवले. जिथे त्यांनी येथील शांत समुद्र किनारे पर्यटनासाठी किती महत्त्वाचे असून यासाठी येथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर सरकारला लक्ष केंद्रित करण्यावर भर दिला. अंजुना, आरंबोलसारख्या समुद्र किनाऱ्यांच्या ठिकाणी वेगळ्या प्रकारच्या मधुर संगीतातून जगभरातील पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. यापुढेही स्वस्त आणि परवडणाऱ्या दरात मद्यनिर्मिती तसेच विविध प्रकारचे सी फूड्स आदींद्वारे पर्यटनाचा आणखी विकास केला. ज्यामुळे अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम झाला. पुढे यात आणखी वृद्धी झाली. कार्निव्हल आणि सेंट फ्रान्सिस झेव्हियरच्या उत्सवामुळे गोवा जागतिक नकाशावर आला. समुद्र किनारे, वारसा स्थळे, नाईटलाईफ आणि समृद्ध संस्कृतीमुळे गोवा एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे, जे परवडणाऱ्या दरात अधिकाधिक सोयी-सुविधा देशी-विदेशी पर्यटकांना देते, अशी त्याची ख्याती आहे.



पर्यटनाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोव्याच्या पर्यटनात गेल्या काही वर्षांपासून सातत्याने घट नोंदवली जात असल्याची आकडेवारी आहे. विशेष म्हणजे, परदेशी पाहुण्यांनी पाठ फिरवण्यास सुरुवात केल्याने गेल्या काही वर्षांपासून पर्यटनाचा केंद्रबिंदू असणारे गोवा कधी नव्हे ते अलीकडच्या काही वर्षांमध्ये मंदीची झळ सोसत आहे. गोव्यात न जाऊ इच्छिणारे पर्यटक इतर पर्यायांची चाचपणी करत आहेत. त्यामुळे सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड आदी जिल्ह्यांना सुवर्णसंधी आहे.

जवळपास गेल्या दशकभराच्या काळापासून गोव्यातील पर्यटनामध्ये घट होत असल्याची चर्चा आहे. सुरुवातीच्या काळात पर्यटनात काहीशी घट जाणवून येत असली तरी काही वर्षांनी ही परिस्थिती बदलेल, अशी आशा गोवेकरांना होती. परंतु, ती फोल ठरली. कोरोनाचा काळ सुरू होण्यापर्यंत पर्यटकांची संख्या रोडावली तरी गोव्यातील अर्थव्यवस्थेला काही जोरदार हादरे बसले नव्हते. परंतु, कोरोना काळ सुरू झाला आणि पर्यटन क्षेत्राला जगभरात मोठा फटका बसला. गोव्यातील पर्यटनावरही त्याचे मोठे परिणाम जाणवले. कोरोना काळ संपल्यानंतर पर्यटनाचे गणितच बदलले. परवडणाऱ्या दरात अधिकाधिक सोयी-सुविधा अशी ज्या गोव्याची ख्याती होती, त्याच गोव्याला जगभरात स्पर्धक निर्माण होऊ लागले आहेत. श्रीलंका, दुबई, थायलंड आदीसारख्या देशांमध्ये परदेशी पर्यटकांना गोव्याप्रमाणेच पर्यटन करण्याची सुविधा निर्माण झाली आहे. त्यामुळे गोव्यातील परदेशी पर्यटकांची संख्या रोडावत चालली आहे. याचा फार मोठा फटका गोव्यातील अर्थव्यवस्थेला बसत आहे.

गोव्यात ओला-उबेरसारख्या कॅबची परवडणारी सुविधा उपलब्ध होत नसल्याने टॅक्सी माफियांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वाटेल त्या दराला ते सेवा देत असून अनेकांची लूटमार होत असल्याचे प्रकार वाढीस लागल्यानंतर येथे पर्यटकांनी येणे कमी केले आहे. टॅक्सी माफियांप्रमाणेच हॉटेल्स, लॉज आणि खाण्या-पिण्याच्या दरांमध्येही काही प्रमाणात वृद्धी होऊ लागल्याने गोवा आता पूर्वीप्रमाणे परवडणारे नव्हे तर अधिक खर्च होणारे पर्यटकांना वाटू लागले आहे. त्यामुळे गोव्यातील पर्यटन घटण्यामागचे हेदेखील एक कारण मानले जात आहे. अलीकडेच गोव्यातील एका हॉटेलला आग लागून काही देशी-विदेशी पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर येथे सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कोरोना काळानंतर गोव्याप्रमाणेच परवडणाऱ्या दरात पर्यटनासाठी सोयी-सुविधा निर्माण करत इतर देशांनी येथील पर्यटक आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला, तसेच प्रयत्न महाराष्ट्रातील समुद्र किनारा लाभणाऱ्या जिल्ह्यांनी करण्याची गरज आहे. देशी-विदेशी पर्यटकांसाठी येथे दर्जेदार सोयी-सुविधा निर्माण करण्याकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. सर्वात आधी समुद्र किनारे स्वच्छ करणे आवश्यक आहे. पर्यटकांना आकर्षिक करणारे वॉटर स्पोर्टस्, स्कुबा डायव्हिंग आदी सुविधा परवडणाऱ्या दरात अनेक ठिकाणी उपलब्ध झाल्या पाहिजेत. आपल्याकडे केवळ सिंधुदुर्गातील तारकर्ली येथेच गेल्या काही वर्षांपासून स्कुबा डायव्हिंग करण्याची सोय आहे. सिंधुदुर्गाप्रमाणेच ती अन्य समुद्र किनाऱ्यांवरही उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी दर्जेदार रस्ते तयार झाले पाहिजे. तसेच, या रस्त्यांवरून प्रवास करण्यासाठी सार्वजनिक प्रवासाची सुविधा ही सर्वसामान्यांना परवडणारी असावी. रस्ते, रेल्वेसह विमानतळे असावीत जेणेकरून देशांतर्गत पर्यटकांसोबत परदेशी पाहुण्यांनाही येथे सहज पोहोचता येईल. तरच पर्यटन व्यवसाय वृद्धीस लागेल.

कोकणात सिंधुदुर्गातील चिपी हे एकमेव विमानतळ आहे. त्याचाही वापर योग्य पद्धतीने होताना दिसत नाही. अनेकजण चिपीपेक्षा गोव्यातील मोपा विमानतळावर उतरून सिंधुदुर्गात पोहोचतात. मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या १४ वर्षांपासून रखडलेल्या स्थितीत आहे. रेल्वेची कन्फर्म तिकिटे मिळत नाहीत. दलालांच्या काळाबाजारीमुळे कोकणवासीयांना गावी जाण्यासाठी नेहमी संघर्ष करावा लागतो. जेथे कोकणवासीयांचे गावी जाणे अडचणीचे होते, तेथे पर्यटक पर्यटनासाठी कसे पोहोचणार, याचाही विचार शासनकर्त्यांनी करावा. येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी अधिकाधिक उत्तम हॉटेल्स, लॉज पार्टी करण्यासाठी स्वस्त दरात मद्य तसेच दळणवळणाच्या अधिकाधिक परवडणाऱ्या सुविधा निर्माण करायला हव्यात. तरच अधिकाधिक पर्यटक आपल्याकडे आकर्षक होतील.

देश-विदेशातील पर्यटक येथे येण्यास सुरुवात झाल्यास महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला आणखी हातभार लागेल. कोकण हे स्वगार्सारखे सुंदर असल्याचे सांगितले जाते. स्वगार्सारखा सुंदर प्रदेश आपल्याकडे गेल्या अनेक वर्षांपासून असूनही आपण त्यातून अपेक्षित असा लाभ घेऊ शकलेलो नाही. त्याउलट गोव्याने शेकडो वर्षांच्या पोतुर्गीजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतरही पर्यटनात जग जिंकले. त्यामुळे आता गोव्याचे पर्यटन घटल्याने आपल्याला आता सुवर्णसंधी चालून आली आहे. ती दवडून चालणार नाही.

## ‘या’ समस्यांना टाळायचं असेल तर साखरेला ठेवा दूर!

**आपल्या** रोजच्या आहारात कमी अधिक प्रमाणात साखरेचं प्रमाण चांगलंच असतं. काही वेळा प्रत्यक्षरीत्या तर काही वेळा अप्रत्यक्षरीत्या साखर आपल्या शरीरात जात असते. साखर शरीरासाठी आवश्यक घटक आहे. मात्र या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचीही तितकीच गरज आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातक ठरू शकतो. त्याप्रमाणेच साखरेचंही आहे. शरीरात साखरेचं प्रमाण अधिक असेल तर अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे.



- आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर त्याचा परिणाम थेट तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे. शरीरात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर त्वचेचा पोत सुधरतो. त्वचा मुलायम आणि तजेलदार होते. विशेषतः रात्रीच्या वेळी साखरयुक्त पदार्थ कमी खाल्ले तर चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाहीत. तसंच चेहऱ्यावरील मुरुम, डागही क मी होतात.
- साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर शांत झोप लागते.
- साखर जास्त खाल्ल्याने जळजळ आणि श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो.
- साखर खाल्ल्यामुळे वजन झपाट्याने वाढतं. त्यामुळे डोनट्स, पेस्ट्री, केक, मिठाई असे पदार्थ शक्यतो खाणं टाळा.
- साखरेचे प्रमाण जास्त असल्यास स्मरणशक्ती कमकुवत होते.
- साखरेमुळे मधुमेह होण्याची शक्यता असते.

# ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उपाय...

ओठ काळसर पडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. असंतुलित आहार, पिग्मेंटेशन, खूप वेळ उन्हामध्ये वावरणे, हलक्या प्रतीची प्रसाधने, विशेषतः हलक्या प्रतीची लिपस्टिक वापरणे, अशा किती तरी कारणांमुळे ओठ काळसर पडू शकतात. पण काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास ओठांचा रंग पुन्हा पूर्ववत होण्यास सहाय्य मिळते.

**ग्रीन टी**
आपण दिवसभरात अनेकदा चहा किंवा कॉफी घेत असतो. पावसाळ्यात किंवा थंडीच्या मोसमात तर चहा किंवा कॉफी पिण्याचे प्रमाण अजूनच वाढते. पण चहा किंवा कॉफीच्या अतिसेवनाने देखील ओठ काळसर दिसू शकतात. त्यामुळे दिवसातून अनेकदा चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा, ग्रीन टीच्या सेवनाचे प्रमाण वाढवा. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलिफेनॉल्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करून, उन्हामुळे किंवा चहा – कॉफीच्या अतिसेवनाने काळसर पडलेले ओठ पुन्हा पूर्ववत करण्यास मदत करतात. ग्रीन टी च्या टी–बॅग्स थोड्याशा पाण्याने ओलसर करून घेऊन, त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज केल्यासही ओठांचा काळसरपणा दूर होण्यास मदत मिळते, तसेच ओठ मऊ राहतात.



**नारळ :** आपल्या आहारात नारळाचा समावेश अवश्य करा. हे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. नारळाचे पाणी प्या, त्याचे ताजे खोबरे भाज्यांवर किंवा गरमागरम पोहे, उपमा, खिचडीवर घालून खा किंवा कुठल्याही भाजीच्या ग्रेव्हीमध्ये नारळाचे दूध वापरा. नारळाचे तेलही स्वयंपाकामध्ये वापरता येऊ शकेल. नारळाच्या सेवनाने त्वचा नितळ राहते. नारळाचे तेल दररोज ओठांना लावल्यास ओठ गुलाबी व मऊ राहतील.

**मध :** रात्री झोपण्यापूर्वी थोड्या मधाने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. हे मध रात्रभर ओठांवर तसेच राहू द्यावे. मधाचा वापर आपल्या आहारामध्येही नियमित करावा. मधात अँटी ऑक्सिडंट्स व मॅग्नेशियम हा क्षार भरपूर प्रमाणात असल्यामुळे ओठांना मृदुता प्राप्त होऊन, त्यांचा काळसरपणा दूर करण्यास मध उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे टोमॅटोही ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उत्तम आहेत. यामध्ये असलेले सेलेनियम सूर्याच्या प्रखर उन्हापासून ओठांचे रक्षण करते. टोमॅटोचा वापर आपल्या आहारामध्ये तर करावाच, शिवाय उन्हामधून फिरून आल्यानंतर त्वरित टोमॅटोची पेस्ट ओठांवर लावावी. असे केल्याने, उन्हामुळे ओठांवर आलेला काळसरपणा दूर होतो.



**अक्रोड :** अक्रोडमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स त्वचेमधील कोलाजेन वाढवण्यास सहाय्य करतात. त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढल्याने त्वचा लवचिक होते. अक्रोडची जरा जाडसर पेस्ट बनवून त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने ओठांच्या त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन ओठांचा काळसर पडलेला रंग हलका होण्यास मदत होईल. तसेच दह्याच्या वापराने त्वचा नितळ होऊन त्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत मिळते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दह्याचा समावेश अवश्य करावा. दह्यामध्ये थोडेसे केशर घालून त्याने ओठांचा मसाज केला असता, ओठांवरील पिग्मेंटेशनमुळे आलेला काळसरपणा दूर होण्यास मदत मिळेल.

**लिंबाचा रस :** आपल्या शरीरामधील ॲसिड्स व तीव्र अल्कलींमुळे ओठ काळसर पडू शकतात. गरम पाण्यामधून लिंबाचा रस घेतल्याने शरीरामधून ही ॲसिड्स व अल्कली बाहेर टाकण्यास मदत मिळते. लिंबू हे अत्यंत प्रभावी ब्लीच आहे. थोडीशी साखर एका लिंबाच्या लहान फोडीवर घालून त्याने ओठ चोळल्यास ओठांचा काळसरपणा दूर होतो. त्याचप्रमाणे ॲलो व्हेरा किंवा कोरफड, ओठांचा काळसरपणा दूर करण्यास उपयुक्त आहे. ॲलो व्हेराच्या रसाचा समावेश आपल्या आहारात करावा आणि त्याच्या गराने ओठांवर नियमित मसाज करावा. या उपायाने ओठांचा काळसरपणा दूर होऊन ओठ पुनश्च गुलाबी व मृदू होतील.



## पी हळद आणि हो बरी

**मराठीत** एक म्हण आहे. पी हळद अन् हो गोरी. या म्हणीचा अर्थ काही वेगळा आहे. कोणत्याही उपायाचा परिणाम पटकन होत नसतो. हळद प्यायल्यावर लगेच कोणी गोरी होत नसते असे या म्हणीतून सुचवायचे आहे, पण प्रत्यक्षात मात्र हळद ही काही बाबतीत चटकन आणि बराच गुण देणारी आहे. असे काही प्रयोगातही दिसून आले आहे. काही लोकांनी हळद मिसळलेले पाणी दररोज सकाळी प्राशन करून त्याचे फायदे नोंदवले आहेत तर काहींनी हळदीचा चहा किती गुणकारी असतो याचा अनुभव घेतला आहे. दररोज सकाळी साधारण ग्लासभर पाणी घ्यावे. ते गरम करावे आणि कोमट झाल्यावर त्यात अर्धा चमचा हळद मिसळावी. हे पाणी थंड झाल्यावर प्यावे त्याचे अनेक फायदे होतात.



हळद ही जंतुनाशक असते. त्यामुळे ती अनेक रोगांचा सामना करण्यास उपयोगी पडते. काही वेळा ती काही रेडिएशन्सचाही प्रतिकार करण्यास फायदेशीर ठरली आहे. सध्या आपण मोबाईल फोन फार वापरतो आणि त्याच्या रेडिएशन्सचा आपल्यावर काही परिणाम होण्याची शक्यता असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हळद वापरायला मिळाली तर अशा परिणामांपासून आपण दूर राहू शकतो. हळद पाण्यात मिसळून प्यावी किंवा आहारात तिचा समावेश अवश्य होईल याची दक्षता घ्यावी. आपल्या समाजात दूध आणि हळद पिण्याची पद्धत आहे. त्यामुळे बसलेला घसा मोकळा होतो. घशाला कसला संसर्ग झाला असेल तर हळद आणि दूध गुणकारी ठरते. खोकला आल्यावर तर हळद आणि दूध घेतातच. ते घेतल्यावर दुसरे कसलेही औषध घेण्याची गरज नाही असे मानतात.

काही लोक हळदीचा चहा तयार करतात. तो तयार करण्याची पद्धत आहे. कपभर पाण्यात चमचाभर हळद टाकून हे मिश्रण उकळा. नंतर त्याला खाली उतरवून त्यात थोडा मध टाका. त्याशिवाय त्यात थोडे लिंबू पिळा किंवा त्यात संत्र्याचा रस मिसळा. त्यामुळे या मिश्रणाला चांगली चव येईल. असा हा चहा प्याल्याने वजन कमी होण्यास मदत होते. संधिवाताचा त्रास कमी होतो. शिवाय यात काही मिनरल्स रोगप्रतिकारक आणि कर्करोगास प्रतिबंध करणारे आहेत. जगाच्या काही भागात हळदीचा असा चहा फार लोकप्रिय आहे. कारण त्यामुळे मधुमेहाचा उपद्रव कमी होतो. हळद हे अगदी सहजगत्या उपलब्ध होणारे औषध आहे. त्याचा वापरही आपण करीत असतो, पण त्याचे अनेक फायदे आपल्याला माहीतही नसतात.

# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**अँड्रॉइड अपडेट**

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

## राजगिरा सॅलड

राजगिरा हे एक सुपर फूड आहे. यामध्ये भरपूर पौष्टिक गुणधर्म आहेत. म्हणूनच आज बनवलं आहे, राजगिऱ्याचं सॅलड.

**साहित्य :** १ वाटी राजगिऱ्याच्या लाह्या, १ कप दूध, २ चमचे साय, १ चमचा मध, मोसंबी, केळी, चिक्कू, चेरी, अक्रोड, पिस्ते.

**कृती :** सगळ्यात आधी दूध गरम करून घ्या. कोमट होईपर्यंत बाजूला ठेवा. फळं सोलून त्याचे बारीक तुकडे करून घ्या. राजगिऱ्याच्या लाह्या फळांसोबत मिसळून घ्या. त्यामध्ये अक्रोड आणि पिस्ते, चेरीजसुद्धा घाला. आता दूध, साय आणि मध छान एकजीव करून घ्या. हे मिश्रण फळं आणि राजगिऱ्याच्या मिश्रणावर ओता. थोडा वेळ फ्रिजमध्ये ठेवून थंडगार खा!



# चेहऱ्यावरील फॅट्स कमी करण्यासाठी

**च्युइंगम चघळा :** च्युइंगम चघळ्याने गालावरील फॅट्स कमी होण्यास मदत मिळते. जेवल्यानंतर काही मिनिटांसाठी च्युइंगम चावण्याची सवय टाकून घ्या. पण हे क्रिया इतकी अधिक नसावी की याने आपला गळा किंवा जबडा दुखायला लागेल.



**एक्स आणि ओचा अभ्यास :** पूर्णपणे किमान १५ वेळा एक्स आणि ओ या शब्दांचा उच्चारण करावे. जरा मिनिट आराम देऊन ही क्रिया तीनदा करावी. हा सोप्या उपायाने आपला जबडा मजबूत होईल आणि दोन वेगवेगळ्या प्रकारे जबड्याच्या व्यायामदेखील. या उपाय कधीही आणि केव्हाही करत येऊ शकतो.

**जबडा उघडा :** आपले तोंड गोल आणि विस्तृत करून उघडा आणि काही सेकंदांसाठी अश्याच मुद्रेत राहा. जबड्याला आराम देऊन पुन्हा करा. हा व्यायाम ९ वेळा करावा. वाटल्यास दिवसातून तीन-तीनदा करू शकता. अधिक वेळा केल्यास वेदना जाणवू शकतात.

**चीक लिफ्ट करण्यासाठी :** आपले गाल आपल्या डोळ्यांकडे उचला. यासाठी तोंडाचे कोपरे वापरा. गाल उचलण्यासाठी डोळे बंददेखील करू शकता. हा व्यायाम आपल्या सोयीप्रमाणे अनेकदा करता येऊ शकतो. पण अती नसावी हे लक्षात असू द्या.

**फिश लिप्स :** गाल आतल्या बाजूला ओढा. दोन्ही ओठ बाहेरून खेचून मासोळीसारखे ओठ करावे. दहा सेकंदांसाठी ही मुद्रा असू द्यावी. हा व्यायाम दहा वेळा करावा.

**ओठ ओढून गाल फुगव :** हा व्यायाम करण्यासाठी ओठ ओढून गाल आतल्या बाजूला ओढा. जसे काही चोखताना केले जातात. काही सेकंद स्थिर राहा आणि नंतर जितकं शक्य असेल तेवढे गाल फुगवा. फुगलेले गाल स्थिर असू द्या नंतर पुन्हा आतल्या बाजूला ओढा. दहा वेळा हा व्यायाम करा. दिवसातून तीनदा दहा-दहा वेळा हा व्यायाम केला जाऊ शकतो.

**गाल फुगवा :** आपलं तोंड बंद करून गाल आणि तोंडात वारं भरा. नंतर एका गाळातील वारं दुसऱ्या गालात घेऊन जा. किमान दहा वेळा वारं एका गाळातून दुसऱ्या गाळात भरत राहा. हा व्यायाम दिवसातून तीन वेळा करा.

**हसा :** हसल्याने चेहऱ्याच्या व्यायाम होते. दहा सेकंद हसण्याच्या मुद्रेत स्थिर राहा. दहा वेळा ही क्रिया करू शकता. तसेच दिवसभर हास्य स्मित ठेवल्याने चेहऱ्यावरील फॅट्स कमी होतील आणि दिवसभर सकारात्मकता राहील.

**गालाची मालीश :** सर्व व्यायाम झाल्यानंतर आपल्या बोटांनी सर्क्युलर मोशनमध्ये हळुवार गाल आणि जबड्याची मालीश करा. याने वेदना आणि ताण कमी होईल.



# दात पडतात दाढांचे काय ?

**लहान मुलांच्या दातांचा प्रश्न जेव्हा निर्माण होतो तेव्हा दात, दाढदुखीची तीव्र वेदना मुलांसोबत मोठ्यांसाठीही काहीशी वेदनादायी ठरते. काय उपाय करावेत यावेळी काही सुचत नाही. अनेकदा डॉक्टरी उपायांना मुलं घाबरतात. पालकही काहीसे डगमगतात. यावेळी मग काहीसे घरगुती उपाय डोके वर काढतात, पण मुलांचा त्रास काही कमी होत नाही.**

**अधिकता** वयाच्या सहा-सात वर्षांनंतर मुलांचे दात पडतात, दरम्यान, होणाऱ्या वेदना या काहीशा सहन होण्याजोग्या नसल्या तरी त्या सहन करण्यावाचून पर्याय नसतो. त्याचबरोबर ज्यावेळी दाढ दुखते तेव्हाही तीच स्थिती असते. यावेळी हिरडी सुजणे, वेदना होणे, त्याचा परिणाम मुलांच्या झोपेवर होणे आदी त्रासाला सामोरे जावे लागते. यावेळी एक उपाय म्हणून ती दाढ काढून टाकली, तर त्या वेदनेपासून सुटकारा मिळू शकतो, असा काहींचा समज असतो. मात्र अकाली दाढ काढणे चांगले की वाईट, त्याचे काय परिणाम होतात याची कारणेही पालकांनी समजून घेतली पाहिजेत. बहुतेक वेळा मुलांना जेव्हा दात येतात त्यावेळी मुलांना जुलाब होणे, उलट्या होण्याचाही त्रास होतो. यावेळी या साऱ्याचा संबंध दात येण्याशी जोडला जातो. यावेळी अधिकतम होणारा त्रास हा मुलांना सहन होण्याजोगा नसतो. यावेळी मुलांच्या शरीरातील पाणीही कमी होते. तर काही वेळा मुलांना डॉक्टरी इलाजाशिवाय पर्याय नसतो किंबहुना सलाईनही लावावे लागते.

लहान मुलांच्या दात, दाढदुखीमुळे घरगुती इलाज म्हणून लवंग तेलाचाही वापर केला जातो. मुलांना दूध बॉटल लागत असल्यामुळे वयाच्या सात वर्षांपर्यंतही काही मुलं दूध पिण्यासाठी बॉटलचा वापर करतात. याशिवाय सातत्याने चिप्स, चॉकलेट खात असल्यामुळे याचा परिणाम दात किडण्यावर होतो, दाढा दुखण्यावर, सुजण्यावर होतो. यावेळी पालकांनी सतर्क राहून मुलांच्या दातांची काळजी घेतली पाहिजे. शिवाय मुलांना दोन वेळा ब्रश करण्याची सवय लावणे, कोणताही पदार्थ खाल्ल्यानंतर चूळ भरायला लावणे आदी सवयी लावण्याची गरज आहे. याखेरीज मुलांचे सहा-सहा महिन्यांनी चेकअप करणे आवश्यक आहे. दातांची स्वच्छता, कोणते पदार्थ किती प्रमाणात खावेत, ते खाल्ल्यानंतर चूळ भरावी आदी गोष्टींवर लहानपणापासून मुलांनाही दातांची काळजी घेण्याची सवय लावली, तर ते फायदेशीर ठरू शकते. लहान मुलांच्या दाढा लहानपणीच शक्यतो काढू नयेत. यामुळे नंतर येणारी दाढ ही जागा मोकळी मिळाल्याने वेडीवाकडी येते. मूल जर आठ ते नऊ वर्षांचे असेल, तर दाढ काढू शकतो. मात्र त्याआधी दाढ न काढणेच हितावह. त्याचप्रमाणे मुलांना दुधाची बॉटल न देणे, शक्यतो मूल दीड वर्षाचे झाल्यानंतर त्याला दूध बंद करणे, कारण मूल रात्री दूध पिऊन झोपले तर दात किडण्याची शक्यता असते. दिवसातून दोन वेळा ब्रश करणे, दूध, चोको, बिस्कीट खाल्ल्यानंतर चूळ भरणे, दात, दाढदुखीनंतर तत्काळ डॉक्टरी इलाज करणे, आदी गोष्टी पालकांनी समजून घेतल्या पाहिजेत. याशिवाय मुलांना दात येताना जुलाब होणे ही बाब दात येण्याशी निगडित नाही.




# ब्लूटूथ डिव्हाइसशी कनेक्ट होत नसेल तर बदला ‘या’ सेटिंग्स

तुमच्या फोनच्या ब्लूटूथमध्ये समस्या येत असल्यास किंवा ब्लूटूथ कोणत्याही डिव्हाइसशी कनेक्ट होत नसल्यास काळजी करण्याची गरज नाही. खाली दिलेल्या स्टेप्स फॉलो करा. ब्लूटूथ हे सर्व अँड्रॉइड फोनमधील सर्वात उपयुक्त फीचरपैकी एक आहे, जे युजर्सना दोन अँड्रॉइड फोनमध्ये फाइल्स शेअर करण्याची परवानगी देते. ब्लूटूथ फोनला कोणत्याही वायरलेस डिव्हाइसशी कनेक्ट करण्याची परवानगी देते. पण अचानक ब्लूटूथने काम करणे बंद केले तर? ही एक सामान्य समस्या आहे. जर तुमच्याही अँड्रॉइड फोनवर ब्लूटूथ काम करत नसेल तर त्याचे निराकरण कसे करावे हे जाणून घ्यायचे असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी.

**असे** का होते? ब्लूटूथ एक इन बिल्ट फीचर आहे. मुख्यतः समस्या फोनच्या फर्मवेअरमध्ये असते. फोनची ओएस म्हणजेच ऑपरेटिंग सिस्टीम जुनी किंवा आऊटडेटेड. फोनच्या सॉफ्टवेअरमधील त्रुटीमुळे.ब्लूटूथ कॅशे फाइल्समध्ये मालवेअर हल्ला झाला असेल तर, नेटवर्क सेटिंग्जमध्ये समस्या असल्यास किंवा उपकर जवळ ठेवले असल्यास.

### काय करावे ?

डिव्हाइस अनपेअर करा. जर ब्लूटूथ दोन डिव्हाइसेससह जोडलेले असेल, परंतु कनेक्ट करण्यात अक्षम असेल, तर तुम्हाला दुसरे डिव्हाइस अनपेअर करावे लागेल. काही वेळा किरकोळ त्रुटींमुळेही असे घडते. यासाठी तुम्हाला खाली दिलेल्या स्टेप्स फॉलो कराव्या लागतील. फोनच्या सेटिंगमध्ये जा.



त्यानंतर ब्लूटूथवर जा आणि कनेक्टेड डिव्हाइसेसवर जा. त्यानंतर तुम्ही जोडणी रद्द करू इच्छित असलेल्या डिव्हाइसच्या पुढील “I” चिन्हावर टॅप करा. त्यानंतर Forget this device पर्यायावर टॅप करा. काही सेकंद प्रतीक्षा करा आणि नंतर डिव्हाइस पुन्हा जोडा.

### डिस्कव्हरेबल फीचर :

- वरील पद्धतीनंतरही तुम्हाला हीच समस्या येत असेल, तर तुम्हाला डिस्कवरेबल फीचर चालू करावे लागेल. हे वैशिष्ट्य बंद असताना, तुम्हाला ब्लूटूथ कनेक्शन समस्या येतात. ते चालू करण्यासाठी स्टेप्स फॉलो करा.
- प्रथम सेटिंगमध्ये जा आणि नंतर ब्लूटूथवर जा.
- ब्लूटूथवर टॉगल करा. त्यानंतर ब्लूटूथ डिस्कव्हरेबल फीचर चालू करा. डिव्हाइस पुन्हा कनेक्ट करण्याचा प्रयत्न करा.

### ब्लूटूथ सेटिंग्ज रीसेट करा :

ब्लूटूथच्या नेटवर्क सेटिंगमध्ये बग असल्यास, तुम्हाला कनेक्टिव्हिटी समस्यांना सामोरे जावे लागते. या प्रकरणात त्याची सेटिंग्ज रीसेट करा. यासाठी तुम्हाला आधी सेटिंगमध्ये जावे लागेल. त्यानंतर सिस्टमवर जावे लागेल. त्यानंतर प्रगत ड्रॉप-डाऊन बटणावर टॅप करा. त्यानंतर रीसेट पर्यायांवर टॅप करा आणि वाय-फाय, मोबाइल आणि ब्लूटूथ रीसेट करा.

**'जी उत्तर' विभाग :**

- (धारावी सकाळचा पाणीपुरवठा) - जस्मिन मील मार्ग, माटुंगा कामगार वसाहत, संत रोहिदास मार्ग, ६० फूट मार्ग, ९० फूट मार्ग, संत कक्कैया मार्ग, एम. पी. नगर ढोरवाडा, महात्मा गांधी मार्ग, धारावी लूप मार्ग, ए. के. जी. नगर (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ पहाटे ४.०० ते दुपारी १२.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- धारावी सायंकाळचा पाणीपुरवठा - धारावी मुख्य मार्ग, गणेश मंदीर मार्ग, दिलीप कदम मार्ग, जस्मिन मील मार्ग, माहीम फाटक, ए. के. जी. नगर (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ सायंकाळी ४.०० ते रात्री ९.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सायंकाळी ५.०० ते रात्री १०.०० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)

**'के पूर्व' विभाग :**

- मुलगाव डोंगरी, एम. आय. डी. सी., मार्ग क्रमांक १ ते २३, ट्रान्स अपार्टमेंट, कोंडिविटा, महेश्वरीनगर, उपाध्यायनगर, ठाकूरचाळ, साळवेनगर, भवानीनगर, दुर्गापाडा, मामा गॅरेज (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ सकाळी ११.०० ते दुपारी २.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)
- विजय नगर, मरोळ, मिलीट्री मार्ग, वसंत ओआसिस, गावदेवी, मरोळ गाव, चर्च रोड, हिल व्ह्यू सोसायटी, कदमवाडी, भंडारवाडा, उत्तम ढाबा (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ सायंकाळी ५.३० ते रात्री ९.३०) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)
- आंतरराष्ट्रीय विमानतळ व सिप्झ झ (२४ तास पाणीपुरवठा) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ दरम्यान पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)
- चकाला, प्रकाशवाडी, गोविंदवाडी, मालपाडोंगरी क्रमांक १ व २, हनुमाननगर, मोटानगर, शिवाजीनगर, शहीद भगतसिंग वसाहत (भाग), चरतसिंग वसाहत (भाग), मुकुंद रुग्णालय, तांत्रिक विभाग, लेलेवाडी, इंदिरा नगर, मापखान नगर, टाकपाडा, विमानतळमार्ग क्षेत्र, चिमटपाडा, सागबाग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, रामकृष्ण मंदीर मार्ग, जे. बी. नगर, बगरखा मार्ग, क्रांतिनगर
- कबीर नगर, बामणवाडा, पारसीवाडा, विमानतळ क्षेत्र, तरुण भारत वसाहत, इस्लामपुरा, देऊळवाडी, पी. न्ड टी. कॉलनी. (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी २.०० ते सायंकाळी ५.३०) (मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)
- कोलडोंगरी, जुनी पोलीस गल्ली, विजय नगर (सहार मार्ग), मोगरापाडा (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ सायंकाळी ५.०० ते रात्री १०.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सायंकाळी ५.०० ते रात्री १०.०० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- ओमनगर, कांतीनगर, राजस्थान सोसायटी, साईनगर (तांत्रिक क्षेत्र), सहार गाव, सुतार पाखाडी (पाईपलाईन क्षेत्र) (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ पहाटे ५.०० ते सकाळी ८.००) (बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)

**'एस' विभाग :**

- विक्रोळी (पश्चिम)- कांजूरमार्ग (पश्चिम)- सूर्यानगर, आंबेडकर चौक, लाल बहादूर शास्त्री मार्ग, सनसिटी संकुल (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी १२.३० ते रात्री ११.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज दुपारी १२.३० ते रात्री ११.०० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- भांडुप (पश्चिम) झ कोकण नगर, समर्थ नगर, काजू टेकडी, क्वारी रोड, जमील नगर, उत्कर्ष नगर, साई हिल, साईविहार, टेंभीपाडा, भक्तिपाडा, टँक रोड, जनता बाजार तलाव मार्ग, तुळशेतपाडा, व्हिलेज गाव, दत्तमंदीर मार्ग, शास्त्रीनगर, सोनापूर (नियमित पाणीपुरवठ्याची पहाटे ५.०० ते सकाळी १०.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज पहाटे ५.०० ते सकाळी १०.०० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- मोरारजी नगर, गौतम नगर, जयभिम नगर, पासपोली गाव, कैलाश नगर (२४ तास पाणीपुरवठा) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ रोजी पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)
- बेस्ट नगर, फिल्टरपाडा, गावदेवी, स्काऊटगाईड, महानगरपालिका सेवानिवासस्थान (बीएमसी स्टाफ क्वार्टर) (नियमित पाणीपुरवठ्याची सकाळी ७.०० ते ११.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सकाळी ७.०० ते ११.०० पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)
- पठाणवाडी, महात्मा फुलेनगर, आरे मार्ग (नियमित पाणीपुरवठ्याची सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० पाणीपुरवठा पूर्णपणे बंद)
- भांडुप (पश्चिम) झ श्रीरामपाडा, त्रिमूर्ती नगर, वाघोबा वाडी, तानाजीवाडी, नरदास नगर, शिवाजी नगर (२४ तास पाणीपुरवठा) (मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज कमी दाबाने पाणीपुरवठा)
- तानाजीवाडी उदंचन केंद्र झ तानाजीवाडी, चाफ्याचा पाडा, ड्क लाईन मार्ग (नियमित पाणीपुरवठ्याची सकाळी ११.३० ते दुपारी ३.००) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सकाळी ११.३० ते दुपारी ३.०० कमी दाबाने पाणीपुरवठा)
- रामनगर उदंचन केंद्र झ रामनगर (नियमित पाणीपुरवठ्याची सकाळी ८.०० ते ११.३०) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सकाळी ८.०० ते ११.३० कमी दाबाने पाणीपुरवठा)
- साई हिल, साईविहार (नियमित पाणीपुरवठ्याची रात्री ८.०० ते १०.३०) *(मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज रात्री ८.०० ते १०.३० कमी दाबाने पाणीपुरवठा)
- माता रमाबाई नगर (नियमित पाणीपुरवठ्याची सायंकाळी ४.१५ ते ७.४५) (मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सायंकाळी ४.१५ ते ७.४५ या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- हनुमान नगर, पानसरे कुंपण, हनुमान टेकडी, अशोक टेकडी, फुलेनगर, मुत्तु कुंपण (नियमित पाणीपुरवठ्याची मध्यरात्री ३.४५ ते सकाळी ११.४५) (मंगळवार, २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज मध्यरात्री ३.४५ ते सकाळी ११.४५ या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)

**'एच पूर्व' विभाग : वांद्रे पूर्व**

- संपूर्ण वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) मोतिलाल नगरसह (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ सायंकाळी ४.३० ते ७.०० (मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज रात्री १०.०० ते ११.४० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)

**'एन' विभाग घाटकोपर, विद्याविहार**

- लोअर डेपो पाडा येथून पाणीपुरवठा झ अप्पर डेपो पाडा, लोअर डेपो पाडा, सागर नगर, महानगरपालिका इमारत विभाग (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी १.०० ते सायंकाळी ५.३०) *(मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज दुपारी १.०० ते सायंकाळी ५.३० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- विक्रोळी पश्चिम रेल्वे स्थानक मार्ग, फिरोजशाह नगर, गोदरेज कुंपण (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी १.०० ते रात्री १०.३०) (मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज दुपारी १.०० ते रात्री १०.३० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- कैलाश संकुल एएसटी आणि पीए येथून पाणीपुरवठा झ मेफेअर इमारती, कैलाश संकुल (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी १२.३० ते २.००) (मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज दुपारी १२.३० ते २.०० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- वाधवा रेसिडेंसी, प्रेसिडेंशियल टॉवर्स, कल्पतरु संकुल, आर सिटी मॉल, ऑर्किड्स इमारत, दामोदर पार्क, पंकेश बाबा दर्गा, उद्यान गल्ली, संघानी इस्टेट, श्रेयस सिनेमागृह, साईनाथ नगर, नित्यानंद नगर (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ सायंकाळी ५.३० ते रात्री १०.३०) (मंगळवार, दिनांक २० जानेवारी ते बुधवार, २१ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सायंकाळी ५.३० ते रात्री १०.३० या वेळेत कमी दाबाने पाणीपुरवठा)
- जी उत्तर, के पूर्व, एच पूर्व, एन व एस विभागातील नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पाण्याचा आवश्यक साठा करुन ठेवावा. दुरुस्तीच्या कालावधीत काटकसरीने पाणी वापरावे. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून पुढील काही दिवस पाणी उकळून - गाळून प्यावे, महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.



# मुंबईतील धारावीसह पूर्व आणि पश्चिम उपनगरीमध्ये येत्या मंगळवारपासून ४४ तासांचा पाणी ब्लॉक

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या मेट्रो लाईन ७ अ प्रकल्पाच्या कामासाठी २ हजार ४०० मिलीमीटर व्यासाच्या अपर वैतरणा मुख्य जलवाहिनीचा काही भाग वळविण्यात आला आहे. या वळविण्यात आलेल्या भागाचे छेद – जोडणी (क्रॉस कनेक्शन) चे काम के पूर्व विभागात मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. ही कार्यवाही मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजेपासून गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत (एकूण ४४ तास) सुरु राहणार आहे. परिणामी, जी उत्तर, के पूर्व, एस विभाग, एच पूर्व आणि एन विभागातील काही भागांमध्ये वेगवेगळ्या वेळापत्रकानुसार कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. नियमित पाणीपुरवठ्याच्या वेळेतदेखील बदल होणार आहे. तसेच, काही भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे, याची नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी, असे आवाहन मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

## २६ जानेवारीपासून लोकल ट्रेन प्रवाशांचा प्रवास आणखी सुखकर होणार, दररोज १२ अतिरिक्त रेल्वे वाढणार

■**मुंबई । प्रतिनिधी,**

पश्चिम रेल्वे मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची माहिती आहे. २६ जानेवारी २०२६ पासून पश्चिम रेल्वे मार्गावर १२ अतिरिक्त एसी लोकल ट्रेन सेवा सुरू करण्यात येणार आहे. वातानुकूलित (एसी) लोकल ट्रेन सेवांचा आणखी विस्तार होणार असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे.

**लोकलच्या वेळेत किरकोळ बदलाची शक्यता**

नव्या लोकलपैकी आठ एसी लोकल गर्दीच्या वेळेत धावतील. सकाळी चार एसी आणि संध्याकाळी चार एसी लोकल ट्रेन धावतील. या नव्या एसी लोकलमुळे प्रवाशांना मोठा फायदाहोणार असून आरामदायी प्रवास करता येणार आहे. नव्या एसी लोकल सेवांमुळे इतर उपनगरीय लोकलच्या वेळेत किरकोळ बदल होऊ शकतात, अशी माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**एसी लोकलच्या संख्येत वाढ**

या नव्या एसी लोकल ट्रेनमुळे मध्य रेल्वेवरील एकूण एसी लोकल ट्रेनची संख्या मुंबईमध्ये ९४ होईल. या ९४ पैकी मुख्य मार्गावर ८० आणि हार्बर मार्गावर १४ एसी सेवा असतील.

काही दिवसांपूर्वी, मध्य रेल्वेने हार्बर मार्गावर २६ जानेवारी २०२६ पासून १४ एसी लोकल सेवा सुरू करण्याची घोषणा केली होती. मात्र या सेवा सध्याच्या नॉन–एसी लोकल गाड्यांची जागा घेतील. दरम्यान, काही वर्षांपूर्वी हार्बर मार्गावर एसी लोकल सेवा सुरू करण्यात आल्या होत्या. परंतु कमी प्रवाशांमुळे, प्रवाशांच्या कमी प्रतिसादामुळे त्या रद्द करण्यात आल्या होत्या.



**पश्चिम रेल्वे मार्गावर एसी लोकल सेवेत वाढ**

सध्या, पश्चिम रेल्वे आठवड्याच्या दिवशी १०९ एसी लोकल चालवते. शनिवारी आणि रविवारी ६५ एसी लोकल ट्रेन पश्चिम रेल्वे मार्गावर चालवल्या जातात. आता या एसी लोकलच्या संख्येत वाढ करण्यात येत आहे. पश्चिम रेल्वे मार्गावर सोमवार ते शुक्रवार या वेळेत एकूण एसी लोकलची संख्या १२१ असेल. तर आठवड्याच्या शेवटी, अर्थात शनिवार आणि रविवारी ७७ एसी लोकल चालवल्या जातील. एकूण १२ नव्या एसी लोकल सोमवारपासून चालवल्या जातील.

## महायुतीचा झेंडा फडकल्यानंतर २४ तासांच्या आत मंत्रिमंडळाची बैठक

■**मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा निकाल शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत जाहीर झाला. या निकालानुसार मुंबईसह २० महापालिकांमध्ये भाजपचा तर ठाणे आणि कल्याण डोंबिवलीत शिवसेनेचा महापौर होण्याची शक्यता आहे. मुंबईमध्ये भाजप महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला. या विजयामुळे १९९७ नंतर पहिल्यांदाच उद्धव यांचा पक्ष मुंबई महापालिकेत विरोधी बाकांवर बसणार आहे. याआधी १९९७ ते २०२२ पर्यंत मुंबत उद्धव यांच्याच पक्षाची सत्ता होती. या ऐतिहासिक विजयानंतर २४ तासांच्या आत मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक झाली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अनेक जनहिताचे निर्णय झाले.



**मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे निर्णय :**

- अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या १ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास व संचालनालयाचे नाव अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय करण्यास मान्यता. जिल्हा नियोजन समित्या, सहआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, मानव विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम, नक्षलवाद विशेष कृति आराखडा कक्ष यांच्या कार्यालयांसाठी आवश्यक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध. (नियोजन विभाग)
- अटल बिहारी वाजपेयी शिवडी- न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय. वाहनधारकांना दिलासा (नगर विकास विभाग)
- मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा - २ (एमयुटीपी -२) साठी सुधारित खर्चास व शासन हिस्सा उचलण्यास मंजुरी. (नगर विकास विभाग)
- तिरूपती देवस्थानास पद्मावती देवी मंदिरासाठी दिलेल्या उलवे येथील भुखंडासाठीचे शुल्क माफ (नगर विकास विभाग)
- पीएम झ ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या एक हजार ई- बस सुविधेसाठी निधी वळता करण्याच्या थेट प्रणालीस मान्यता. पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझम अंतर्गत पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून डायरेक्ट डेबीट मॅन्डेट (डीडीएम) द्वारे संबंधित कंपन्यांना खर्चाची रक्कम मिळणार ( नगर विकास विभाग)
- भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव (ता. भिवंडी ) येथे सर्वोपयोगी झ मल्टी मॉडेल हब व टर्मिनल मार्केटची उभारणी. त्यासाठी राज्य कृषि पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून देणार. व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लॅंट विकीरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी (महसूल विभाग)
- यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटींची मान्यता. प्रकल्पामुळे पाच तालुकयातील ५२ हजार ४२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार. अमरावती जिल्ह्यातील मौजा धामकच्या पुनवर्सनाचा प्रश्न मार्गी (जलसंपदा विभाग)
- मुंबईतील पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध होणार. मुंबई पोलिस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पास मंजुरी. मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थाने बांधली जाणार. ( गृह विभाग)
- राज्यातील युवकांना परदेशातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था (महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलीटी अँण्ड अँडव्हान्समेंटस झ महिमा) स्थापन करण्यास मंजुरी. प्रशिक्षित, कुशल युवकांना जगभरातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी समन्वय व अंमलबजावणीसाठी संस्था काम करणार. (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)
- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास पनवेल (पश्चिम) येथील भूखंड देण्यास मान्यता. महामंडळाला मुख्यालयाची व बहुउद्देशीय इमारत उभी करता येणार. ( नगर विकास विभाग)



## एमआयआमची जोरदार मुसंडी

**तब्बल १२५ उमेदवार विजयी**

"मुंबईत हिंदूंचा जन्मदर १.३ टक्के तर मुस्लिमांचा जन्मदर २.६ टक्के म्हणजे दुप्पट आहे. त्यामुळे २०५० मध्ये हिंदू ५४ टक्क्यांखाली आणि मुस्लीम लोकसंख्या ३० टक्क्यांवर जाईल", असा दावा भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अलीकडे केला होता. तुष्टीकरणाचे राजकारण करणाऱ्या असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएम पक्षाचे राज्यभरात तब्बल १२५ नगरसेवक निवडून आल्याने या दाव्याला पुष्टी मिळाली आहे. मुंबईत सहा जागांवर एमआयएमचे उमेदवार विजयी झाले. मानखुर्द-गोवंडी या भागात एमआयएमने समाजवादी पक्षाला मोठा धक्का दिला. मुंबईतील मुस्लीम लोकसंख्या असलेल्या भागात औवेसी यांची जादू चालल्याचे दिसून येते. छत्रपती संभाजी नगरमध्ये संख्या सर्वाधिक राज्यातील २९ पैकी १३ महापालिकांमध्ये एमआयएमचे १२५नगरसेवक विजयी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर महापालिकेत त्यांचे सर्वाधिक ३३ नगरसेवक निवडून आले, तर मालेगाव महापालिकेत २० नगरसेवक निवडून आले आहेत. मुंबई महापालिकेत मागील सार्वत्रिक निवडणुकीत केवळ दोन जागांवर नगरसेवक निवडून येणाऱ्या एमआयएमने या निवडणुकीत तब्बल सहा नगरसेवक निवडून आले आहेत. मात्र, या निवडणुकीत समाजवादी पक्षाचे केवळ दोनच नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत समाजवादी पक्षाच्या सायकलचा टायर पंक्चर झाला असून एमआयएमचा पतंग भलताच हवेत उडाला असल्याचे दिसून येत आहे. मुंबई महापालिकेत मागील निवडणुकीत समाजवादी पक्षांचे सहा नगरसेवक निवडून आले होते, तर एमआयएमचे दोन नगरसेवक निवडून आले होते. एमआयएमचा एक नगरसेवक शिवसेनेत गेले होते. परंतु, या निवडणुकी एमएमआयने, समाजवादी पक्षाला मागे टाकले आहे. या निवडणुकीत एमआयएमने बाजी मारत आपले सहा नगरसेवक निवडून आणले आहेत. समाजवादी पक्षाचा गड असलेल्या मानखुर्द गोवंडीतच एमआयएमचा विजय झाला. एमआयएमचे सहा नगरसेवक निवडून आल्यामुळे त्यांचा पक्षाचा एक गटनेता निवडला जाणार असून त्यांना गणसंख्येच्या आधारे स्थायी समिती तसेच अन्य समित्यांमध्ये गटनेत्याला सदस्य प्राप्त होणार आहे. समाजवादी पक्षामध्ये आमदार अबू आझमी आणि आमदार रईस शेख यांच्यांत उघडपणे युध्द चालले होते आणि रईस शेख यांनी काँग्रेस उमेदवाराचा प्रचार केला होता.

## ठाकरे बंधूंच्या हातून मुंबई निसटणार, हे आधीच ठरलेलं... निकालामागील ४ उघड गुपितं

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिका.... केवळ मुंबईतच राहणाऱ्या नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येकाचं लक्ष मुंबईत कोण जिंकणार, याकडे लागलं होतं. याचं कारण म्हणजे मुंबई केवळ राज्याची राजधानी नसून मराठी अस्मितेचा केंद्रबिंदूही आहे.

मुंबईत ठाकरे जिंकणार का, असाच प्रश्न सगळ्यांना पडला होता. पण ठाकरेंच्या हातून मुंबई निसटली आणि मुंबईवर भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा भगवा फडकला. राज आणि उद्धव ठाकरेंची छत्रपती शिवाजी महाराज पार्क इथं झालेली वादळी सभा... या सभेतून झालेली वातावरण निर्मिती आणि मराठी अस्मितेचा मुद्दा... हे सगळं असतानाही मुंबई ठाकरेंचा पराभव का झाला, असा प्रश्न सगळ्या महाराष्ट्राला पडलाय. ठाकरेंच्या पराभवाला चार प्रमुख गोष्टी कारणीभूत ठरल्याचं दिसत आहे.



**१. पक्षफुटीनं खिळखिळी झालेली शिवसेना आणि शिंदे फॅक्टर**

२०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत उभी फूट पडली. शिवसेनेच्या बहुसंख्य आमदार आणि खासदारांनी एकनाथ शिंदेंची साथ दिल्याने पक्षाचं नाव आणि धनुष्यबाण हे चिन्हही उद्धव ठाकरेंनी गमावलं. शिंदेंनी महाराष्ट्रभरातील शिवसेनेच्या संघटनेवर कब्जा तर मिळवलाच, पण ठाकरेंचा बालेकिल्ला असलेल्या मुंबईतही पक्षाला मोठं भगदाड पाडलं. मुंबईतल्याही अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदेंची साथ दिली. मुंबई महानगरपालिकेची याआधीची निवडणूक झाली होती ती २०१७ साली. या निवडणुकीत एकसंध शिवसेनेचे ८४ नगरसेवक निवडून आले होते. मात्र राज्यात सत्तेत असलेल्या एकनाथ शिंदेंनी महानगरपालिकेतही उद्धव ठाकरेंना जोरदार झटका दिला. मागच्या वेळी निवडून आलेल्या ८४ नगरसेवकांपैकी जवळपास ६० नगरसेवक यंदा निवडणुकीआधी शिंदेंसोबत गेले होते. मुंबईत ठाकरेंना मानणारा आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती असणारा एक मोठा वर्ग आहे. मात्र एकीकडे ज्यांना आपण मानतो असे ठाकरे आणि दुसरीकडे स्थानिक पातळीवर जो संकटात आपल्या हाकेला धावून येतो, असा स्थानिक नगरसेवक... अशा स्थितीत अनेकदा मतदारांकडून वैयक्तिक फायदा बघून स्थानिक नेतृत्वाला साथ दिली जाते. या पार्श्वभूमीवर शिंदेंकडे असलेले ६० हून अधिक नगरसेवक गेमचेंजर ठरल्याचं आजच्या निवडणूक निकालात दिसून येतंय... त्याबरोबरच ठाकरेंकडून भाजप म्हणजे परप्रांतीयांचा पक्ष असं मराठी मतदारांच्या मनावर ठासवण्याचा प्रयत्न होत होता. या प्रयत्नाला छेद दिला तो शिंदेंनीच. कारण ठाकरे एकनाथ शिंदेंवर कितीही टीका करत असले तरी ते शिंदेंना किंवा त्यांच्याकडे असलेल्या धनुष्यबाणाला परप्रांतीय ठरू शकणार नव्हतेच. हा मुद्दयाही या निवडणुकीचा टर्निंग पॉइंट ठरला.

**२. एका सभेतून वातावरणनिर्मिती आणि चमत्काराची अपेक्षा**

राज्य सरकार लादू पाहत असलेल्या हिंदी सक्तीच्या मुद्दयावरून साधारण जुलै महिन्यात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे बंदू एकत्र आले. ठाकरे कुटुंबाचे समर्थक असलेल्या मराठी जनांना ज्या क्षणाची सर्वाधिक प्रतीक्षा होती तो क्षण ५ जुलै २०२५ रोजी प्रत्यक्षात उतरला. वरळी डोम इथं झालेल्या विजयी मेळाव्यात ठाकरे बंधू एकत्र दिसले आणि मुंबई महापालिका निवडणूक हे दोघेही एकत्रित लढवणार हेदेखील तेव्हाच स्पष्ट झालं. त्यानंतर निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी ठाकरे बंधूंच्या काही बैठकाही झाल्या. मात्र ग्राऊंडवर दोन्ही पक्षांच्या फारशा काही हालचाली दिसल्या नाहीत. जुलै ते आता जानेवारी.... ठाकरे बंधूंच्या हातात ६ ते ७ महिने होते... मात्र या प्रचंड मोठ्या कालावधीत दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना कोणताही ठोस कार्यक्रम देण्यात आला नाही. मागच्या महिन्यात निवडणूक आयोगाकडे महापालिका निवडणुकांची घोषणा करण्यात आल्यानंतर दोन्ही पक्ष जागे झाले आणि त्यानंतर जागावाटप होऊन दोन्ही पक्ष रिंगणात उतरले. राज आणि उद्धव यांच्यासह आदित्य आणि अमित ठाकरेंनी मुंबईतील दोन्ही पक्षांच्या विविध शाखांना भेटी दिल्या. मात्र या भेटी प्रत्यक्ष निवडणूक काळात देण्याऐवजी जो शांततेचा काळ होता...म्हणजे एकत्र आल्यानंतर मागील सहा महिन्यांचा जो कालावधी होता तेव्हाच शाखाभेटी देऊन पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या अनुषंगाने ठोस कार्यक्रम देण्याची आवश्यकता होती, असं निरीक्षण आता जाणकारांकडून नोंदवलं जातंय... मुंबईत जे लोक राहतायत त्यांना हे माहीत आहे की मतदान अगदी तोंडावर येऊन ठेपले तरी मुंबईत निवडणुकीचं वारं कुठेही दिसतच नव्हतं. निवडणुकीत रंग भरले ते छत्रपती शिवाजी महाराज पार्क इथं झालेल्या ठाकरे बंधूंच्या संयुक्त सभेने. या सभेत राज ठाकरेंनी उद्योगपती गौतम अदानी यांच्या वाढत्या साम्राज्याबद्दल आपल्या शैलीत प्रेझेंटेशन देऊन मराठी जनांना संभाव्य धोक्याची जाणीव करून दिली. या सभेची सोशल मीडियावर तुफान चर्चा झाली. अगदी गावखेड्यातील व्यक्तीही या सभेत राज ठाकरेंनी मांडलेल्या मुद्द्याविषयी चर्चा करू लागला. पण तुम्हाला निवडणुका जिंकायच्या असतील तर एखाद्या सभेच्या भरोशावर राहून... त्यातून काहीतरी चमत्कार होईल, अशी अपेक्षा ठेवून ती जिंकता येत नाही, हेच निकालातून स्पष्ट झालं आहे.

**३. भावनिक कार्डवर डिपेंड, विकासाच्या अजेंड्याने चितपट**

आधी हिंदीसक्ती आणि शेवटच्या टप्प्यात अदानींसारख्या गुजराती उद्योगपतींच्या वाढत्या साम्राज्याचा मुद्दा अधोरेखीत करून दोन्ही ठाकरेंनी मुंबईत मराठी अस्मितेचा मुद्दा ऐरणीवर आणण्याचा प्रयत्न केला. मुंबईत महापौर मराठी होणार की नाही, या मुद्दयावरूनही बऱ्याच चर्चा झाल्या. भाजपची सत्ता आल्यास मराठी महापौर होणार नाही, हे ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी ठासून सांगण्याचा प्रयत्न केला. पण आमची सत्ता आल्यावर हिंदू महापौर होईल आणि फक्त हिंदू नाही तर हिंदू मराठी महापौर होईल, असं देवेंद्र फडणवीसांनीही ठणकावून सांगितलं. त्यामुळे ठाकरेंच्या मराठीच्या मुद्द्याला म्हणावी अशी धार उरली नाही. एकीकडे ठाकरेंची शिवसेना मराठीचा मुद्दा पुढे करत असताना तुम्ही मागच्या दोन दशकांपासून सत्तेत आहात. तुम्ही आधी काय केलं आणि भविष्यात काय करणार, हे प्रभावीपणे लोकांसमोर मांडणं अपेक्षित होतं. आदित्य ठाकरेंकडून काही प्रमाणात तो प्रयत्न झालाही, मात्र उद्धव ठाकरेंच्या भाषणात या मुद्द्यावर फारसं लक्ष दिलं गेलं नाही. दुसरीकडे भाजपकडून देवेंद्र फडणवीस मात्र मुंबईत होत असलेल्या विकासकामांवर ठामपणे बोलत होते. कोस्टल रोड, मेट्रो, अटल सेतू ही काम वाजवून सांगत होते. फडणवीसांना इन्फ्रा मॅन अशी आपली ओळख या निवडणूक प्रचारात प्रस्थापित केली. या सगळ्यामुळे भाजप हाच विकासाची दृष्टी असणारा पक्ष असल्याचं परसेप्शन तयार करण्यात फडणवीस यशस्वी ठरले.

**४. अमराठी मतदारांची एकजूट**

शिवसेनेची राजकीय वाटचाल आपण पाहिली तर सुरुवातीच्या काळात मराठीचा मुद्दा आक्रमकपणे उचलणाऱ्या शिवसेनेची वाटचाल नंतरच्या काळात मात्र मराठी आणि हिंदुत्व अशा दुहेरी मार्गाने झाल्याचं दिसतं. त्यामुळे मुंबईत मराठी मतदारांसह अमराठी पण धमार्ने हिंदू असलेल्या मुंबईकरांनाही शिवसेना आपलीशी वाटत. परंतु यंदाच्या निवडणुकीत राज ठाकरे सोबत आल्याने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनंही मराठीचा मुद्दा आक्रमकपणे मांडला. परिणामी उत्तर भारतीय, गुजराती, मारवाडी अशा अमराठी मतदारांमध्ये असुरक्षिततेचा तयार झालं आणि आपसुकच ते एकजुटीने भाजपचा बाजूने उभे राहिले, हे निवडणूक निकालाने दाखवून दिलंय. दरम्यान, ठाकरे बंधूंच्या सभेने सोशल मीडियावर झालेल्या वातारणनिर्मितीमुळे अनेकांना मुंबईत ठाकरेंचीच लाट असल्याचं वाटत होतं. त्यामुळेच मुंबईत झालेला ठाकरेंचा पराभव काहींना धक्कादायक वाटत आहे. पण मुंबईची निवडून जवळून बघणाऱ्यांना हा पराभव आधीच दिसू लागला होता, हे मात्र नक्की.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी – ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com